दैनिक
लोकरक्षणाय
लोकशाहीच्या संरक्षणार्थ

www.lokrakshanay.com epaper.lokrakshanay.com dainiklokrakshanay@gmail.com 97023 86118

●कार्यकारी संपादक- अनिकेत घनश्याम भंकाळ ●वर्ष-०१,अंक-२६२ ●पृष्ठे-०४ ●ठाणे, बुधवार, ६ मार्च २०२४ ●RNI.REG. NO. MAHBIL/2023/86118 ●रु.२/-

महायुतीत जागावाटपावरुन महाभारत, शिवसेना, राष्ट्रवादी 'इतक्या' जागांवर ठाम

मुंबई, यश सावंत :
लोकसभा निवडणुकीसाठी महायुतीतल्या सर्वच पक्षांनी कंबर कसलीय. राज्यभरात प्रचार दौरे सुरु झाले आहेत. निवडणुकीच्या रणधुमाळीला खऱ्या अथार्ने सुरुवात झालीय. मात्र कळीचा मुद्दा ठरलाय तो जागावाटपाचा. महायुतीचं जागावाटप अजूनही ठरलेलं नाही. 48 लोकसभा जागांवर कोण कुठून लढणार याची वाटणी अजून झालेली नाही. एकनाथ शिंदेंच्या शिवसेनेने 22 तर अजित पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेसने 10 जागांची मागणी केलीय. त्यामुळे भाजपवरही मोठा दबाव आहे. महायुतीत असे अनेक मतदारसंघ जिथे तीनही पक्षांनी आपापला दावा ठोकलाय.

धाराशिवच्या जागेवर तीनही पक्षांनी दावा केलाय. तर परभणीत राष्ट्रवादी आणि भाजपमध्ये वाद सुरु आहे. नाशिकच्या शिंदेंच्या जागेवरही भाजप इच्छुक आहे. सिंधुदुर्गात जागा शिंदे गटाची असली तरी भाजपचे नारायण राणे लढण्यासाठी इच्छुक आहेत. हिंगोलीत शिंदे गटाचे मराठवाड्यातले एकमेव खासदार आहेत. मात्र तिथेही भाजप पदाधिकाऱ्यांनी जागा मिळवण्यासाठी पक्षश्रेष्ठींना पत्र पाठवलंय. छत्रपती संभाजीनगरमध्येही शिंदे आणि भाजप यांच्यात वाद आहेत. बुलढाण्यात तर तिनही पक्षांनी दावा ठोकलाय. तर माढ्यामध्येही भाजप आणि अजित पवार गटामध्ये लढण्यावरुन वाद आहे. कोकणात रायगडमध्येही तीनही पक्षांनी दावा केलाय. तर उत्तर पश्चिम मुंबईत भाजप आणि शिंदे गटात वाद होण्याची शक्यता आहे.

छत्रपती संभाजीनगरमध्ये भाजपने एकनाथ शिंदेंच्या शिवसेनेला जोरदार धक्का देण्याची रणनीती आखलीय. केंद्रीय अर्थराज्यमंत्री भागवत कराड संभाजीनगरमधून लढण्यासाठी इच्छूक आहेत. एकीकडे शिंदे गट आणि भाजपमध्ये जागावाटपावरुन वाद होण्याची शक्यता आहे. तर दुसरीकडे अजित पवार गटही राष्ट्रवादीकडे असणाऱ्या जागांसाठी आग्रही आहे. जागावाटपाच्या मुद्द्यावर अजित पवार गटाच्याही बैठका होतायत.

धाराशिव, परभणी, नाशिक, सिंधुदुर्ग-रत्नागिरी, हिंगोली, संभाजीनगर, बुलडाणा, माढा, रायगड, उत्तर पश्चिम मुंबई या मतदारसंघांवरुन तीनही पक्षांमध्ये वाद आहेत. शिवसेना 22 जागा लढण्यावर ठाम आहे. अजित पवार गटाला 10 जागा पाहिजेत. तेव्हा आता अमित शाहाच हा तिढा कसा सोडवणार हे पाहावं लागणार आहे.

नाशिकमध्येही जागेवरुन तिढा..

नाशिकचा दिंडोरी लोकसभा मतदारसंघही राष्ट्रवादीला देण्यात यावा अशी मागणी करण्यात आलीय.. मुंबईत राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाची नाशिक आणि दिंडोरी लोकसभा मतदारसंघाची बैठक पार पडली. कांदा निर्यातबंदीमुळे दिंडोरी लोकसभा मतदारसंघात भाजपविरोधात नाराजी असल्याचं चित्र आहे. त्यामुळे दिंडोरीतून राष्ट्रवादी काँग्रेसचा उमेदवार निवडून येण्यास मदत होऊ शकते अशी भावना कार्यकर्त्यांनी बोलून दाखवलीय. सध्या दिंडोरी लोकसभा मतदारसंघात राष्ट्रवादी काँग्रेसचे चार आमदार, शिवसेनेचा एक तर भाजपचा एक आमदार आहे. दिंडोरी लोकसभा मतदारसंघातून सध्या केंद्रीय राज्यमंत्री भारती पवार या भाजपच्या खासदार आहेत.

डोंबिवली एमआयडीसीतील १५ कंपन्यांनी पालिकेचा लाखोचा मालमत्ता कर थकविल्याने जप्तीची नोटीस

कल्याण,रोहित जैसवाल :
डोंबिवली एमआयडीसीतील १५ कंपन्यांनी मालमत्ता कर थकबाकीची रक्कम भरणा करण्यासाठी वारंवार नोटिसा देऊनही कंपनी चालक त्यास दाद देत नसल्याने कल्याण डोंबिवली पालिका प्रशासनाने या कंपन्यांना जप्तीपूर्व अखेरची सूचना देणाऱ्या नोटिसा काढल्या आहेत. नोटीस मिळाल्यानंतर ७२ तासांच्या अवधीत कंपनी चालकांनी थकीत मालमत्ता कर भरणा केला नाही तर मालमत्ता जप्तीचा इशारा नोटिसीत देण्यात आला आहे.

मार्च वर्षाअखेर मालमत्ता कर वसुलीचा लक्ष्यांक पूर्ण करण्यासाठी पालिकेने आयुक्त डॉ. इंदुराणी जाखड यांच्या आदेशावरून कर, पाणी देयक थकबाकीदारांविरुद्ध कठोर कारवाईचे पाऊल उचलले आहे. त्याचा फटका डोंबिवली एमआयडीसीतील १५ थकबाकीदार कंपन्यांना बसला आहे.

कल्याण अंबरनाथ मॅन्युफॅक्चरर्स असोसिएशनने (कामा) पालिकेच्या या आक्रमक कारवाईबद्दल तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. संबंधित कंपनी चालकांची बाजू ऐकून मगच पालिकेने योग्य ती कार्यवाही करावी. थेट मालमत्ता जप्तीची कारवाई करू नये, असे संघटनेचे अध्यक्ष देवेन सोनी यांनी सांगितले.

अनेक वर्ष एमआयडीसी हद्दीत रस्ते नव्हते, पाणी टंचाई, सार्वजनिक स्वच्छता हे विषय प्रलंबित होते. तरीही उद्योजक नियमितपणे पालिकेत कर भरणा करत होते. याचा विचार पालिका प्रशासनाने करावा, असे अध्यक्ष सोनी यांनी सांगितले.

मालमत्ता जप्तीचा हुकूम काढल्यावर मालमत्ता करात हुकूम शुल्क पाच टक्के, हुकूम बजावणी शुल्क १० टक्के आकारले जाणार आहे. अखेरचा जप्ती हुकूम बजावल्यानंतरही मालमत्ता धारकाने थकीत रक्कम भरणा न केल्यास ती मालमत्ता पालिका जप्त करून त्या मालमत्तेचा लिलाव करून संबंधित रक्कम वसूल केली जाईल, असा इशारा प्रशासनाने दिला आहे.

पालिकेने उद्योजकांना पाठविलेल्या कर थकबाकी नोटीसींबाबत उद्योजकांच्या कामा संघटनेच्या बैठकीत सविस्तर चर्चा करू. २००२ पूर्वी पालिका जो कर उद्योजकांना आकारत होती. तोच कर सरसकट २७ गावांसह उद्योजकांना लावण्याचा पालिकेचा ठराव आहे. पालिका प्रशासनाने वेळोवेळी पालिकेच्या मालमत्ता करासंदभार्तील संगणकीय देयक प्रणालीत उन्नत्तीकरण करून मालमत्ता कराची दुरुस्तीची देयके उद्योजकांना दिली जातील, असे आश्वासन यापूर्वी दिले आहे. तरीही प्रशासन उद्योजकांची मालमत्ता जप्तीची कारवाई करते. करोनानंतर आता कुठे उद्योजक स्थिरस्थावर होत आहेत. याचा विचार पालिकेने करावा, असे अध्यक्ष सोनी यांनी सांगितले.

गोखले पूल आणि बर्फीवाला पूल जोडणे अशक्य, मुंबई पालिकेला उलगडा; उत्तर शोधण्यासाठी व्हीजेटीआयची मदत



मुंबई : प्रतिनिधी
अंधेरी पूर्व आणि पश्चिमेला जोडणाऱ्या गोपाळकृष्ण गोखले पूल आणि सी डी बर्फीवाला पूल यांना जोडणे शक्य नाही. असा कठीण उतार दिल्यास अपघात होण्याची शक्यता असल्याचा महापालिका प्रशासनाला अखेर उलगडा झाला आहे. त्याचाच भाग म्हणून व्हीजेटीआयची मदत घेऊन यावर उत्तर शोधण्याचा प्रयत्न असल्याचे पालिका प्रशासनाने स्पष्ट केले आहे. अंधेरी पूर्व आणि पश्चिमेला जोडणाऱ्या गोखले पूलाची एक बाजू सुरू झालेली असली तरी हा पूल जुन्या सी डी बर्फीवाला पुलाला कसे जोडायचे याचे मोठे कोडे पालिकेच्या पूल विभागाला पडले आहे. अंधेरी पश्चिम दिशेला असलेल्या सी डी बर्फीवाला पूल आणि गोखले पूल यांची पातळी नवीन बांधकामामुळे वरखाली झाली आहे, तसेच त्यात अंतर पडले आहे. त्यामुळे, पालिकेच्या कामाबाबत समाजमाध्यमांवरून टीका होऊ लागल्यावर आणि नियोजनाचे हसे होऊ लागल्यावर महापालिकेच्या पूल विभागाने सोमवारी रात्री याबाबत परिपत्रक काढून भूमिका स्पष्ट केली. ही पातळी समतल करण्यासाठी व्हीजेटीआयच्या तज्ज्ञांची मदत घेतली जाणार आहे. व्हीजेटीआयच्या तज्ज्ञांनी घटनास्थळी भेट दिली आहे. हे दोन पूल जोडण्यासाठी कोणती पद्धत वापरावी याबाबत चचार्ही करण्यात आली असल्याचे पालिका प्रशासनाने म्हटले आहे. गोखले पूलाची सध्या एकच बाजू सुरू झाली असून पुलाची दुसरी बाजू सुरू करण्यासाठी ३१ डिसेंबर २०२४ ची मुदत देण्यात आली आहे. तेव्हाच हे दोन्ही पूल जोडण्याचे काम केले जाईल, असे आश्वासन प्रशासनाने दिले आहे. रेल्वे रुळांवरून जाणाऱ्या सर्व पुलांची उंची वाढवण्याचा निर्णय रेल्वे प्रशासनाने घेतला आहे. त्यामुळे, रेल्वेवर नव्याने बांधण्यात येणाऱ्या सर्व उड्डाणपुलांची उंची वाढवण्यात येणार आहे.

पिंपरी-चिंचवड पोलीस दलातील उपनिरीक्षकाच्या मोटारीतून दोन किलो मेफेड्रोन जप्त

पुणे, अभिजित येरल्लू :
मेफेड्रोन (एमडी) अमली पदार्थासह अटक केलेल्या पिंपरी-चिंचवड पोलीस दलातील पोलीस उपनिरीक्षक विकास शेळके याच्या मोटारीतून आणखी दोन किलो ४०० ग्रॅम वजनाचे मेफेड्रोन जप्त करण्यात आले आहे. त्याला सकाळीच पोलीस सेवेतून निलंबित करण्यात आले आहे. पिंपळेनिलख रक्षक चौकात मेफेड्रोन विक्रीसाठी आलेल्या नमामी झा या हॉटेल कामगाराला पोलिसांनी दोन कोटी रुपए किमतीचे मेफेड्रोन (एमडी) अमली पदार्थासह अटक केली होती. एवढ्या मोठ्या प्रमाणात मेफेड्रोन कोठून आणले याची विचारणा पोलिसांनी केल्यावर नमामीने निगडी पोलीस ठाण्यात कार्यरत असलेल्या पोलीस उपनिरीक्षक शेळके याचे नाव घेतले.

चौकशी केली असता शेळकेचा सहभाग स्पष्ट झाला. त्याला ४४ किलो ७९० ग्रॅम किलो वजनाच्या ४४ कोटी ७९ लाख ८० हजार रुपयांचे मेफेड्रोनसह अटक करण्यात आली होती. शेळकेला पोलीस कोठडीत सुनावण्यात आली असून सकाळीच त्याच्यावर निलंबनाची कारवाई करण्यात आली आहे. अटकेदरम्यान उपनिरीक्षक शेळके याची पोलिसांकडून कसून चौकशी केली जात आहे. चौकशी दरम्यान त्याच्या मोटारीत आणखी मेफेड्रोन असल्याची माहिती मिळाली.

१५ हजार घरांचा पुनर्विकास, वांद्रे कुर्ला संकुलात पॉड टॅक्सी प्रकल्प; CM शिंदेंनी दिली मान्यता

मुंबई, विशाल कारंडे :
मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाची मंगळवारी महत्त्वाची बैठक मंत्रालयात पार पडली. महानगरातील रखडलेल्या झोपडपट्टी पुनर्विकास प्रकल्पाला चालना देण्यासाठी मुख्यमंत्र्यांच्या निदेर्शानुसार माता रमाबाई आंबेडकर नगर आणि कामराज नगर येथील सुमारे १५ हजार घरांचा पुनर्विकास करण्यासाठी आज मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण आणि झोपडपट्टी पुनर्विकास प्राधिकरण यांच्यात संयुक्त करार करण्यात आला. यावेळी अन्य महत्वांच्या पायाभूत सुविधा प्रकल्पांबरोबरच वांद्रे कुर्ला संकुलात स्वयंचलित जलद सार्वजनिक वाहतूक परिवहन (पॉड टॅक्सी) प्रकल्प सार्वजनिकखासगी भागीदारी तत्वावर करण्यास मुख्यमंत्र्यांनी मान्यता दिली. दरम्यान, मुंबई महापालिकेप्रमाणेच एमएमआरडीक्षेत्रातही डीप क्लिन ड्राईव्ह घेण्याचे निर्देश मुख्यमंत्र्यांनी मंगळवारच्या या बैठकीत दिले.

ठाणे महानगरपालिका क्षेत्रातील ठाणे परिवहन सेवा यांच्या मालकीच्या बस डेपोसाठीच्या जागांवर अत्याधुनिक बस डेपोचा विकास व सभोवतालच्या शासकीय जमिनीवरील झोपडपट्टयांचे पुनर्वसन करुन उपलब्ध होणाऱ्या मोकळया शासकीय जमिनीचा विकास प्राधिकरणामार्फत करण्यास आजच्या बैठकीत मान्यता देण्यात आली. यामुळे झोपडपट्टयांचे पुनर्वसन होणार असून ठाणे शहर झोपडपट्टी मुक्त करण्याच्या प्रयत्नांना चालना मिळणार असल्याचे शिंदे यांनी सांगितले.

आदित्यला मुख्यमंत्री करायला ते काय BCCI चे अध्यक्षपद आहे का? घराणेशाहीवरुन ठाकरेंचा टोला

मुंबई : प्रतिनिधी
तुम्हाला तुमच्या मुलाला मुख्यमंत्री करायचं आहे, असा माज्यावर आरोप केला जातो. हो करायचं आहे त्याला मुख्यमंत्री पण माज्या मुलाला मतं दिली तर निवडून येईल ना? ते काय बीसीसीआयचं अध्यक्षपद आहे का? जय शाह याचं क्रिकेटमधलं योगदान काय? काय सचिन आणि विराटला खेळायला शिकवलं काय? असा टोला उद्धव ठाकरेंनी लगावला. उरणमधल्या सभेत ते बोलत होते. गेल्यावेळी भाजपनं आपल्यासोबत अधिकृत गद्दारी केली होती. आता भाजप सर्व देशात गद्दारी करायला लागली आहे. भाजपला वाटतंय दुसरा कोणताच पक्ष राहता नये. त्यामुळे मी मैदानात उतरलोय, असे ते म्हणाले. तुम्ही जनतेत उभे राहा आणि सांगा शिवसेना कोणाची? त्यांच्याकडे सीबीआय, ईडी, लवाद आहेत. ते म्हणतील तसे निर्णय देतायत. मर्द मावळे तुमचे गुलाम होणार नाही. निवडणूक घेऊन दाखवा. मी सुद्धा राजकारण बघत मोठं झालंय. घराणेशाही परिवारवाद, अमित शाह आणि मोदींना आव्हान तुम्ही तुमच्या घराण्याचा इतिहास सांगा आणि मी माज्या सांगतो, असे आवाहन ठाकरेंनी केले. स्वातंत्र्य लढ्याचा कुठलाही त्यांना संबंध नव्हता अशी ही माणसं आहेत. भाजप तर तेव्हा नव्हताच. मुस्लिम देखील माज्यासोबत देश वाचवण्यासाठी सोबत आले आहेत. मोदींनी इंडिया आघाडीवर टीका केली. आम्हाला चले जाओ असे म्हणतायत. श्यामाप्रसाद मुखर्जींनी चले जाओ कशी चिरडून टाकावी असं पत्र लिहिलं होतं, असे ते म्हणाले. नितीश कुमार बोलले होते संघ मुक्त भारत करुया. कपिल पाटील यांनी सांगितलं नितीश कुमार गेलेत तर जाऊ द्या, पण मी तुमच्या सोबत आहे. पण चांगलं सरकार तुम्ही पाडलं.जात पात धर्म बाजूला ठेऊन एकत्र येण्याची गरज असल्याचे आवाहन त्यांनी केले आहे. 1977 साली देखील अशीच वेळ आली होती. सुरुवातीला शिवसेनेने पाठिंबा जरुर दिला होता मात्र नंतर काही गोष्टींना विरोध केला होता.

ऑटोरिक्षा व टॅक्सी चालकांविरूद्ध १८६५ तक्रारी प्राप्त; ७३९ परवाने निलंबित

मुंबई : प्रतिनिधी
ऑटोरिक्षा व टॅक्सी चालकांनी गैरवर्तन करणे, भाडे नाकारणे, विहित दरापेक्षा जादा भाडे घेणे या संदभार्तील तक्रार आता व्हॉट्सअप क्रमांकावर तक्रार करता येते. त्यासाठी 9152240303 क्रमांक व mh03autotaxicomplaint@gmail.com ईमेल आयडी प्रादेशिक परिवहन अधिकारी (पूर्व) यांनी उपलब्ध करून दिला आहे. ऑटोरीक्षा व टॅक्सी चालकांविरूद्ध आतापर्यंत 1865 तक्रारी प्राप्त झाल्या असून दोषी आढळलेल्या 739 परवानाधारकांचे परवाने निलंबित करण्यात आले आहे. व्हॉट्सॲप व ईमेल आयडीवर 11 जुलै 2023 ते 29 फेब्रुवारी 2024 पर्यंत 1865 तक्रारी प्राप्त झाल्या आहेत. संबंधित कार्यालयाशी निगडीत 790 तक्रारी आहेत. त्यापैकी 672 तक्रारी या ऑटोरिक्षा व 118 तक्रारी या टॅक्सी सेवे संबंधीत आहेत. तक्रारींमध्ये 588 तक्रारी ठोस कारणाशिवाय भाडे नाकारणे, 59 तक्रारी या मीटरप्रमाणे देय असलेल्या भाडयापेक्षा जादा भाडे आकारणे व 143 तक्रारी प्रवाशांशी गैरवर्तन करणे याबाबत प्राप्त झाल्या आहेत.

ज्ञानवापी व्यास तळघरातील पूजास्थानाला धोका? हिंदू पक्षाची कोर्टात धाव, केला मोठा दावा

नवी दिल्ली, प्रगती शर्मा :
ज्ञानवापी परिसरात असलेल्या व्यास तळघरात हिंदूना पूजा करण्याचा अधिकार देण्याचा महत्त्वपूर्ण निकाल वाराणसी जिल्हा न्यायालयाने दिला होता. मुस्लिम पक्षकारांनी याविरोधात अलाहाबाद उच्च न्यायालयात याचिका दाखल केली होती. मात्र, ही याचिका फेटाळण्यात आली. यातच आता हिंदू पक्षाने ज्ञानवापी व्यास तळघरातील पूजास्थानाला धोका निर्माण होत असल्याचा दावा केला आहे. या प्रकरणी न्यायालयात याचिका दाखल करण्यात आली आहे. हिंदू पक्षातर्फे न्यायालयात बाजू मांडणारे वकील विष्णू शंकर जैन यांनी याबाबत बोलताना मोठा दावा केला आहे. ज्ञानवापीतील व्यास तळघराच्या वरील बाजूस नमाज अदा करण्यास आलेल्या मुस्लिम बांधवांची मोठ्या प्रमाणात गर्दी होत असते. या गदीर्मुळे स्लॅबवर भार येत आहे. त्यामुळे हा स्लॅब कोसळून त्या खाली असलेल्या पूजास्थानाला धोका निर्माण होण्याची शक्यता बळावली आहे. व्यास तळघरातील पूजास्थानाचे संरक्षण व्हावे, यासाठी न्यायालयात याचिका दाखल करण्यात आली आहे, अशी माहिती विष्णू शंकर जैन यांनी दिली. हिंदू पक्षाने याचिकेत नेमके काय म्हटलेय? जिल्हा न्यायालयात याचिका दाखल करण्यात आली आहे. या याचिकेत व्यास तळघराच्या वरील भागात मोठ्या प्रमाणावर जमण्यास मुस्लिम बांधवांना प्रतिबंध करावा, अशी मागणी केली आहे. तसेच व्यास तळघरात दुरुस्तीचे काम करण्याची परवानगी देण्यात यावी, जेणेकरून पूजास्थान संरक्षित करता येईल. व्यास तळघरातील पूजास्थानाची दुरुस्ती न्यायालयाचा आदेश असल्याशिवाय विनाअडथळा होऊ शकत नाही, असे वकील जैन यांनी म्हटले आहे. दरम्यान, ज्ञानवापीतील व्यास तळघरात गणपती, श्रीविष्णू यांच्या एक, तर हनुमंतांच्या दोन, जोशीमठ येथील दोन प्रतिमांची प्रतिष्ठापना करण्यात आली आहे. तर राम नाम लिहिलेली एक वीट स्थापन करण्यात आली आहे. एक मकर आणि एक अखंड ज्योत स्थापन करण्यात आली आहे. याशिवाय दिवसातून पाच वेळा आरतीही केली जात आहे. काशी विश्वनाथ मंदिराचे मुख्य पुजारी ओम प्रकाश मिश्रा आणि अयोध्येतील रामललाच्या अभिषेकासाठी शुभ मुहूर्त ठरवणारे गणेश्वर द्रविड यांनी व्यास तळघरात पहिली पूजा केली.

शेअर गुंतवणूक अंगलट, व्यावसायिकाला कोट्यवधींचा गंडा; सायबर चोरट्यांविरोधात गुन्हा दाखल

ठाणे : प्रतिनिधी
शेअर्स मार्केटमध्ये पैसे गुंतवणूक करण्याच्या नावाखाली सायबर टोळीने ठाण्यातील एका व्यावसायिकाची तब्बल एक कोटी ७१ लाखांची आर्थिक फसवणूक केल्याचा प्रकार समोर आला आहे. या टोळीने अगोदर शेअर्सच्या किंमती कमी दाखवल्या. नंतर, किंमती वाढवत २० कोटी नफा झाल्याचे भासवत व्यावसायिकाला फसवणुकीच्या जाळ्यात ओढले. विशेष म्हणजे, व्यावसायिकाने घेतलेल्या शेअर्सच्या किंमती प्रत्यक्षात वेगळ्या होत्या. अशा प्रकारे आणखी एका व्यक्तीची दीड कोटीपेक्षा जास्त रुपयांची फसवणूक झाली असून, फसवणूकप्रकरणी कासारवडवली पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे. घोडबंदर भागात वास्तव्यास असलेला या व्यावसायिकाची आयुर्वेदिक वस्तूंची एजन्सी असून, ते शेअर मार्केटमध्ये पैशाची गुंतवणूक करतात. मोबाइलवर शेअर मार्केटसंबधित व्हिडीओ पाहत असताना, त्यांनी एका लिंकवर क्लिक केले. त्यानंतर ते आपोआप एका व्हॉट्सॲप ग्रुपशी जोडले गेले. या ग्रुपमध्ये अन्य सदस्यही होते. हे सदस्य त्यांना शेअर मार्केटमध्ये झालेला नफ्याची माहिती देत होते. शेअर मार्केटमध्ये गुंतवणूक केल्यास चांगला नफा मिळेल, असे प्रलोभन दाखवल्याने या व्यावसायिकाने संबधितांशी पुढे बोलणे चालू ठेवले. या संभाषणानंतर व्यावसायिकाला एक ॲप डाऊनलोड करण्यास सांगून या ॲपमध्ये पैशाची गुंतवणूक करण्याविषयी सांगितले.

रेल्वे रूळ ओलांडण्याला बसणार आळा; रेल्वेने घेतला महत्वाचा निर्णय

नवी मुंबई : प्रतिनिधी
रेल्वे रूळ ओलांडताना अनेक लोक जिवाला मुकतात. हे अपघात टाळण्यासाठी रेल्वेच्या वतीने रेल्वे रुळांवर पादचारी पुलांचीही उभारणी केली गेली आहे. मात्र, अनेक प्रवासी वेळ वाचवण्यासाठी रेल्वे रूळ ओलांडण्याची चूक करत असतात. त्यामुळे प्रवाशांनी रूळ ओलांडू नये, म्हणून रेल्वे रुळालगत लोखंडी जाळ्या आणि सिमेंटच्या भिंती उभारण्याचे काम हार्बर रेल्वे मार्गावर सुरू करण्यात आले आहे. त्यामुळे हार्बर मार्गावर इथून पुढे रेल्वे रूळ ओलांडण्याच्या प्रकाराला आळा बसेल. हार्बर मार्गावरील रेल्वे स्थानके मुंबई आणि इतर रेल्वे स्थानकांपेक्षा वेगळी आहेत. इथल्या रेल्वे स्थानकात कुठेही खाद्यपदार्थांचे स्टॉल्स नाहीत. शिवाय स्थानकात दोन्ही दिशेला उतरण्याची सुविधा आहे. त्यामुळे इतर स्थानकांप्रमाणे इथे प्रवाशांची गर्दी होत नाही. मात्र, याठिकाणी सर्रासपणे रेल्वे रूळ ओलांडण्याचे प्रकार होत असतात. रेल्वे आली की प्रवासी उतरून, रेल्वे स्थानकाबाहेर जाण्यासाठी जिन्यांचा नाही तर रेल्वे रुळांचा वापर मोठ्या प्रमाणात करतात. बऱ्याच वेळा रेल्वे बदलून प्रवास करायचा असल्यास बहुतांश प्रवासी रेल्वे रूळ ओलांडूनच रेल्वे पकडतात.

मिठाईच्या दुकानात समोशाचे पीठ पायाने तुडवतानाचा संतापजनक प्रकार

उल्हासनगर - प्रतिनिधी
मिठाई विक्रीच्या दुकानातील कारागीर हा समोसा, कचोरीसाठी तयार करण्यात येणाऱ्या पिठाला पायाने तुडवतानाचा संतापजनक प्रकार एका व्हायरल व्हिडिओमुळे चव्हाट्यावर आला आहे. या प्रकाराने संतप्त झालेल्या गावकऱ्यांनी दुकानावर धडक देऊन दुकानदाराला साहित्य फेकून देण्यास भाग पाडले असून तळलेले पदार्थ विकण्यावर बंदी आणली आहे. उल्हासनगरच्या सीमेवरील आशेळे गाव प्रवेशद्वारावर गेल्या 15 वर्षांपासून हरिओम स्वीट नावाचे दुकान आहे. या दुकानात मिठाई सोबत समोसे, कचोरी, वडापाव, ढोकला आदी खाद्यपदार्थ विक्रीसाठी असतात. जवळपास पंधरा ते वीस हजार लोकसंख्या असलेल्या गावाच्या वेशीवर हे एकमेव गोड पदार्थ विकणारे दुकान असल्याने अख्खे आशळे गाव या दुकानातून मिठाईची खरेदी करते.

//सुविचार

कुठल्याच गोष्टीचा गर्व करू नका
कारण आज जे तुमच्याजवळ आहे उद्या ते नसूही शकते.

नाचणी-वाळकाचे पौष्टिक थालिपीठ

साहित्य : २ किसलेले वाळूक/वाळूख (वाळूक नसेल तर मध्यम आकाराची किसलेली काकडी), नाचणीचे पीठ - दीड वाटी, ज्वारीचे पीठ - २ वाट्या, चणाडाळीचे पीठ - १ वाटी, गव्हाचे पीठ - १/२ वाटी (ऐच्छिक), ओवा - चिमूटभर, चवीनुसार, तीळ - चिमूटभर, चवीनुसार, जिरे - चिमूटभर, चवीनुसार, हळद - चिमूटभर, चवीनुसार, लाल तिखट किंवा चिरलेली हिरवी मिरची - चवीनुसार, मीठ - चवीनुसार, ठेचलेल्या लसणाच्या ५-६ पाकळ्या, कढीपत्ता - वाळवून चुरलेला- अर्धी मूठ, उभा चिरलेला कांदा (ऐच्छिक). तेल - कडेने सोडण्यासाठी आणि थापण्यासाठी (ग्रीसिंग), पिण्यायोग्य पाणी.

पाककृती : सर्व पीठे एकत्र करावी. पिठात चवीचे साहित्य घालून चांगले मिसळावे. त्यात किसलेले वाळूक/काकडी घालून चांगले मिक्स करून घ्यावे. ताजी आणि रसदार फळभाजी असेल तर नंतर पीठ मळून घेतल्यास पाणी कमी लागते आणि चव चांगली येते. बेताने थोडे थोडे पाणी टाकत पीठ मळून गोळा बनवावा. थालिपीठ थापता येईल इतपत कन्सिस्टन्सी असावी. जाड बुडाच्या पॅनला (नॉन स्टिक असेल तर उत्तम) थोडे तेल लावावे, मळलेल्या पिठाचा गोळा हातावर चांगला गोल करून थोडासा पसरवून घ्यावा. हा चपटा गोळा पॅनला आतल्या बाजूने गोलाकार थापून घ्यावा. हाताला थोडेसे तेल लावावे म्हणजे पीठ चिकटणार नाही. पॅनवर झाकण ठेवून मोठ्या आचेवर थालिपीठे उलटसुलट भाजून घ्यावीत.

केसांसाठी घरगुती शाम्पू

तेलकट केसांसाठी

दोन चमचे शिकेकाई पावडर, एक चमचा हिरव्या चण्याची पावडर, अर्धा चमचा मेथी पावडर एकत्र करून चांगले मिश्रण तयार करावे. केसांना लावायच्या आधी मिश्रणात अंड्याचा पांढरा बलक घालून तो केसांना शाम्पूप्रमाणे लावा. हा शाम्पू केसांना लावल्यानंतर फेस येत नाही पण केस स्वच्छ होतात.

एक ग्लास रिठे, चार ग्लास पाण्यात रात्रभर भिजत ठेवाव्या. सकाळी हे पाण्यात कुस्करा व पाणी गाळून घ्या. या पाण्यात एक चमचा शिकेकाई पावडर मिसळून त्याने केस धुवा. केसांना चमक येते.

टोनिंग लोशन

ग्लासभर पाण्यात एक मोठा चमचा लाल व्हिनेगर व चिमूटभर मीठ टाकून चांगले हलवा. या मिश्रणाने केसांच्या मुळांना हळुवार मसाज करा. एका तासाने केस धुऊन नंतर विंचरल्याने केस मऊ होतात.

कोरड्या केसांसाठी शाम्पू

एक ग्लास दुधात एक अंडे फेटून घ्या. मिश्रणाला भरपूर फेस आल्यानंतर केसांना चांगल्या प्रकारे लावा. पाच मिनिटांनंतर केस स्वच्छ धुवा. आठवड्यातून दोनवेळा हा प्रयोग नक्की करा.

एका नारळाच्या दुधात दोन चमचे चण्याचे पीठ किंवा एक लहान चमचा शिकेकाई पावडर मिसळा. केसांच्या मुळांना हे मिश्रण चांगल्या प्रकारे लावा. पाच मिनिटांनंतर केस स्वच्छ धुवा.

काय आपल्यालाही अशा लोकांना पाहून जेलेस फील होते जे बेडवर पडल्याक्षणी झोपून जातात? तर आता जेलेस फील करू नका, कारण ही पद्धत अमलात आणून आपल्या बेडवर पडताक्षणी झोप येईल. या पद्धतीने आपण ३० सेकंदांत झोपाल.

जाणून घ्या 30 सेकंदांत झोपण्याची पद्धत

tq सेकंदांत झोप येण्यासाठी आपल्याला कोणत्याही उपकरणाची गरज नाही.

▮ सर्वात आधी हुश्श आवाज करत तोंडातून श्वास सोडा. ▮ तोंड बंद करून नाकाने हळूवार श्वास घ्या. ▮ आपला श्वास सात अंक मोजेपर्यंत थांबवून ठेवा. ▮ आता आठ अंक मोजेपर्यंत तोंडातून श्वास सोडत राहा. ▮ पुन्हा श्वास घ्या.

एकूण चार श्वासांसाठी हे चक्र तीनदा रिपीट करा.

हे करताना खोल श्वास घ्या आणि सोडा. याने हृदयाच्या ठोक्याचा दर कमी होतो आणि मेंदू शांत राहतो. याने आपण ३० सेकंदांतच शांत झोपतो. लवकर झोप येण्यासाठी हा उत्तम उपाय आहे.

सुंदर चेहऱ्यासाठी 'ही' पाने अत्यंत लाभदायक

चेहरा सुंदर दिसण्यासाठी प्रत्येक जण प्रयत्न करत असतो. मुली अनेक सौंदर्य प्रसाधनांचा सुद्धा वापर करतात. पण ते त्वचेसाठी घातकसुद्धा ठरू शकतात. अनेक कार्यक्रमांमध्ये किंवा जेवणानंतर अनेकांना पान खाण्याची सवय असते. पण या खाण्याच्या पानांमध्ये सौंदर्याचं रहस्य दडलेलं आहे. या पानाचा केवळ खाण्यासाठीच नव्हे तर सौंदर्य खुलवण्यासाठी देखील उपयोग होतो.

चेहरा उजळण्यासाठी :

खायची पाने ३-४ मिनिटे पाण्यात उकळून घ्या. आता याची पातळ पेस्ट बनवून चेहऱ्यावर लावा. तुम्ही यामध्ये थोडे बेसन घालू शकता. १५ मिनिटांनी चेहरा थंड पाण्याने धुवा.

मुरुमांपासून सुटका :

पानाच्या फेसपॅकने चेहरा उजळण्यासह डाग व मुरुमांपासून सुटका मिळते. पानाच्या पेस्टमध्ये थोडी हळद मिसळून घ्या. ही पेस्ट मुरुमांवर लावा. काही वेळाने चेहरा धुऊन घ्या. असे २-३ वेळा केल्यास मुरुमांपासून सुटका मिळेल.

शरीरावर येते चमक :

अंघोळीच्या पाण्यात पान मिसळून वापरल्याने घामाच्या दुर्गंधीपासून तुमची सुटका होईल.

माऊथ फ्रेशनर :

पान हे उत्तम माऊथ फ्रेशनर आहे. पानांना उकळून त्यापासून माऊथ वॉश बनवता येतो. एका भांड्यात पाणी घेऊन त्यात पाने मिसळून उकळून घ्या.

हे पाणी एका भांड्यात साठवून ठेवा. याच्या नियमित वापराने तोंडाचा दुर्गंध घालवता येईल.

आजकालच्या धकाधकीच्या जीवनात घरातल्यांसोबत किंवा फॅमिलीसोबत आपण बाहेर फिरायला जातो, तेच काही क्षण खास आणि आनंदाचे असतात. अशात आता उन्हाळ्याची सुट्टी संपली असली तरी आता पावसाळी पिकनिकसाठी देखील अनेक जण सज्ज झाले आहेत. तर अशावेळी तुम्ही देखील भटकंतीसाठी कुठेतरी बाहेर फिरायला जाण्याचा विचार करत असाल तर गुगल मॅपची खास वैशिष्ट्ये तुमच्यासाठी फारच फायद्याची ठरू शकतात. चला तर जाणून घेऊया गुगल मॅप्सची काही खास फीचर्स जी तुम्हाला पिकनिकला गेल्यावर फारच कामाला येतील.

फिरायला जाताना गुगल मॅप्सची 'ही' तीन फीचर्स येतील खूप कामी

ग्लान्सेबल डायरेक्शन्स

गुगल मॅप्समध्ये ग्लान्सेबल डायरेक्शन्स फीचर सुरू करण्यात आलं आहे. ही सेवा वापरून युजर्स लॉक स्क्रीनच्या माध्यमातून देखील आपला रस्ता ट्रॅक करू शकतात. हे फीचर चालू केल्यानंतर, वापरकर्त्यांना पुढे येणारे वळण किंवा कोणत्याही अपडेटबद्दल कळवले जाईल. यापूर्वी ही माहिती फक्त फुल नेव्हिगेशन मोडमध्ये दिली जात होती. हे फीचर काही महिन्यांतच जगभरात आणले जाईल. हे वॉकिंग, सायकलिंग आणि ड्रायव्हिंग मोडमध्ये मदत करेल. हे अँड्रॉइड आणि आयओएस दोन्ही डिव्हाईसवर उपलब्ध करून दिले जाईल.

रिसेंट ॲप्समध्ये लोकेशन होणार सेव्ह

गुगलने गुगल मॅप्समध्ये एक नवीन सेवा जारी केली आहे जी वापरकर्त्यांना गुगल मॅप्सची विंडो बंद केल्यावरही त्यांच्या रिसेंट ॲप्समध्ये लोकेशन सेव्ह करून

ठेवण्याची सोय करून देतील. वापरकर्त्यांना त्यांनी यापूर्वी भेट दिलेली सर्व ठिकाणे हटवण्याची परवानगी आहे. हे फीचर वापरकर्त्यांना पिकनिक किंवा विशिष्ट ठिकाणी जाताना त्यादरम्यान विश्रांती घेतल्यावरही जिथे प्रवास थांबवला तिथून पुढे सुरू करता येणार आहे.

इमर्सिव्ह व्ह्यू

गुगलने अलीकडेच ॲमस्टरडॅम, डब्लिन, फ्लॉरेन्स आणि व्हेनिस या चार शहरांमध्ये इमर्सिव्ह व्ह्यू सादर केलं आहे. लवकरच इतर ठिकाणीही हे फीचर उपलब्ध करून देण्यात येणार आहे. यामध्ये, प्रगत एआय तंत्रज्ञानाचा वापर करून, इमर्सिव्ह व्ह्यू फीचर अगदी वास्तवदर्शी स्थान, ठिकाणं तयार करते.

रिसेन्टर

हे गुगल मॅप्समधील फीचर तसं जुनंच आहे, पण सर्वांत कामाचं फीचर आहे. कारण आपण गुगल मॅपच्या मदतीने कुठेही जात असताना थोडं जरी आपल्या मोबाईलची दिशा बदलली आणि आपल्याला आपला ट्रॅक दिसत नसेल तर रिसेन्टरवर क्लिक करताच आपण पुन्हा ट्रॅकवर येतो. तसंच मॅप पाहताना एखाददुसरं ठिकाण आपण मॅपमध्ये पाहत असू तरी आपला ट्रॅक भरकटतो पण रिसेन्टरवर क्लिक करताच आपण पुन्हा ट्रॅकवर येतो.

हवं ते वाहन किंवा वॉकिंग ऑप्शन सिलेक्ट करणं

आता हे फारच कॉमन आणि सर्वांना माहीत असलेलं फीचर आहे. आपण कधीही गुगल मॅप्स वापरताना आपल्याला हवं असलेलं लोकेशन टाकतो आणि त्यानंतर आपण बाईक, कार की वॉकिंग त्या ठिकाणी जाणार आहोत, ते सिलेक्ट करतो. यामुळे गुगल आपल्याला त्याप्रमाणे रस्ता दाखवतं. म्हणजे टूव्हीलरने जाण्यासाठी आणि कारने जाण्यासाठी सेम ठिकाणी वेगवेगळा टाइम कधीकधी रस्ताही वेगवेगळा दाखवतो.

सदैव निरोगी राहायचेय मग लिंबूपाणी प्या

सदैव ताजेतवाने आणि फ्रेश राहण्यासाठी लिंबूपाण्याचे सेवन नियमित केलेले चांगले. लिंबूमध्ये 'क' जीवनसत्त्व मुबलक प्रमाणात असते. शरीरासाठी आवश्यक असणारी 'क' जीवनसत्त्वाची कमतरता लिंबूपाणी सेवनाने भरून काढता येते. लिंबूपाण्याने शरीराची रोगप्रतिकारक शक्ती वाढण्याबरोबरच पोटॅशिअमचीही गरज पूर्ण होते. पोटॅशिअममुळे आपल्या मेंदूला फायदा होतो आणि ब्लडप्रेशरवरही नियंत्रण ठेवता येते. तुम्हाला जर चहा, कॉफीची सवय कमी करायची असेल तर लिंबूपाणी उत्तम.

लिंबूपाणी सेवनाचा आणखी एक फायदा म्हणजे रक्तशुद्धी, ज्यामुळे शरीर स्वस्थ राहण्यास मदत होतेच आणि शरीर ताजेतवाने राहते. जीवनसत्त्वाने भरपूर आणि लाभदायक असे हे लिंबूपाणी कधीही सेवन केले तरी चालते मात्र रात्री जेवणानंतर घेऊ नये. हे आपल्या शरीरासाठी हानीकारक ठरू शकते.

'मी कधीही लग्नात...'कंगनाची 'ती' पोस्ट कोणासाठी?

अनंत अन राधिकाच्या प्री वेडिंगवरुन सध्या वेगळ्याच प्रकारची चर्चा सोशल मीडियावर होताना दिसत आहे. या प्री वेडिंग सोहळ्याला बॉलीवूडमधील अनेक सेलिब्रेटी हजर होते. बॉलिवूडमधील जवळपास सर्वच स्टार हे पार्टीमध्ये उपस्थित होते. फक्त उपस्थितच नाही तर धमाकेदार असा डान्स करताना देखील बॉलिवूड स्टार दिसले. मात्र, या पार्टीत कुठेही कंगना राणावत ही दिसली नाही. यात आता कंगनाच्या पोस्टनं प्री वेडिंग आणि त्याला उपस्थिती लावणारे सेलिब्रेटी वरुन वाद सुरु झाला आहे. कंगना राणावत हिने नुकताच सोशल मीडियावर एक पोस्ट शेअर करत बॉलिवूड स्टारचा समाचार घेतलाय. आता कंगना राणावत हिची ही पोस्ट सोशल मीडियवर चांगलीच व्हायरल होताना दिसतंय. अंबानींच्या पार्टीत डान्स करणाऱ्या कलाकारांना चांगलेच खडेबोल सुनावताना कंगना राणावत ही दिसत आहे. विशेष म्हणजे यासोबतच तिने एक मुलाखती शेअर केलीये.

पोस्ट सोबत कंगना राणावत हिने लता मंगेशकर यांची एक मुलाखत शेअर केलीये. या मुलाखतीमध्ये लता मंगेशकर यांनी म्हटले की, मला कोणी जरी पाच लाख डॉलर्स दिले तरी मी येणार नाही. या पोस्टमध्ये कंगना राणावत ही आपली आणि लता मंगेशकरची बरोबरी करताना दिसत आहे. कंगना म्हणते की, मला कोणीही करोडो रुपए दिले तरीही मी कोणाच्या कार्यक्रमात परफॉर्म नाही करणार. कंगनाच्या इंस्टा स्टोरीचा स्क्रिन शॉट व्हायरल होतो आहे. त्यामध्ये तिनं स्वताची तुलना लता मंगेशकर यांच्यासोबत केली आहे. तिनं एका लेखाचा दाखला दिला आहे. ती म्हणते, मला पाच लाख डॉलर दिले तरी मी येणार नाही. मी खूप साऱ्या बिकट आर्थिक परिस्थितीला सामोरी गेली आहे. मात्र आता मी आणि लताजी आम्ही दोघेच असे सेलिब्रेटी आहोत ज्यांची सगळी गाणी लोकप्रिय झाली आहे. कंगना राणावत म्हणते की, मी आयुष्यात खूप आर्थिक संकटातून गेले आहे. लताजी आणि मी असे दोनच व्यक्ती आहोत ज्यांची गाणी खूप हिट आहेत (फॅशन का जलवा, घनी बावली हो गई, लंडन ठुमकदा, साडी गली, विजय भवा) पण तरीही मी लग्नात कधीच नाचले नाही. कित्येकदा सुपरहिट आयटम साँग देखील मला ऑफर करण्यात आले होते. पण ते केले नाही. मी कधीही कोणत्या पुरस्कार सोहळ्याला गेली नाही. पैसा आणि प्रसिद्धी याला नाही म्हणण्यासाठी तुमच्याकडे शुद्ध चारित्र्य आणि अभिमानाची गरज असते.

'बाळूमामाच्या नावानं चांगभलं'नंतर आता सुमीत पुसावळे दिसणार 'घरोघरी मातीच्या चुली' मालिकेत

छोट्या पडद्यावरील 'बाळू मामाच्या नावान चांगभल' या मालिकेमुळे अभिनेता सुमीत पुसावळेला विशेष लोकप्रियता मिळाली. सुमीतनं 'बाळूमामाच्या नावानं चांगभलं' या मालिकेला रामराम करुन आता नव्या मालिकेत एन्ट्री केली आहे. सुमीत हा घरोघरी मातीच्या चुली या मालिकेतून प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. जाणून घेऊयात या मालिकेतील सुमीतच्या भूमिकेबद्दल...18 मार्चपासून प्रेक्षकांच्या भेटीला येणाऱ्या घरोघरी मातीच्या चुली मालिकेची प्रेक्षक आतुरतेने वाट पहात आहेत. मालिकेचा पहिला प्रोमो रिलीज झाल्यापासूनच या मालिकेतील हृषिकेश या भूमिकेबद्दल प्रेक्षकांमध्ये उत्सुकता होती. हृषिकेषची भूमिका नेमका कोणता कलाकार साकारणार? याची कमालीची उत्सुकता होती. अखेर त्या प्रश्नाचं उत्तर संपूर्ण महाराष्ट्राला मिळणार आहे. हृषिकेशची व्यक्तिरेखा साकारणार आहे संपूर्ण महाराष्ट्राचा लाडका अभिनेता सुमीत पुसावळे. सुमीतला याआधी आपण अनेक वेगवेगळ्या भूमिकांमधून भेटलोय. मात्र हृषिकेश ही व्यक्तिरेखा त्याने आजवर साकारलेल्या व्यक्तिरेखांपेक्षा वेगळी आहे. घरोघरी मातीच्या चुली मालिकेतल्या भूमिकेविषयी सांगताना सुमीत म्हणाला, ₹मी याआधी साकारलेल्या भूमिकेतून बाहेर पडून काहीतरी नवं करण्याचा प्रयत्न करतोय. ऐतिहासिक आणि पौराणिक मालिकेनंतर कौटुंबिक मालिकेत काम करण्याचा अनुभव घेतोय त्यामुळे प्रेक्षकांप्रमाणेच मी देखिल उत्सुक आहे. या मालिकेकडे पहाण्याचा माझा दृष्टिकोन नक्कीच वेगळा आहे. खूप चांगले कलावंत मालिकेत आहेत.



दै. लोकरक्षणाय सुडोकू - २४

2			1	6				9
							8	
6	4			9	3			2
			3		1	7		5
	1		4					6
3		9	5	7		1		
		5			2	9	4	
8				5		3		
		6	8	3	4			

उत्तर सुडोकू -२३

1	8	2	6	4	5	7	9	3
6	9	3	1	7	2	5	8	4
4	7	5	8	3	9	6	2	1
7	2	9	4	1	6	8	3	5
3	4	1	2	5	8	9	6	7
8	5	6	3	9	7	4	1	2
5	6	8	7	2	3	1	4	9
9	3	4	5	8	1	2	7	6
2	1	7	9	6	4	3	5	8

एक ते नऊ आकडे आडव्या व उभ्या सरळ रेषेत अशा प्रकारे भरायचे की एका रेषेत एक आकडा एकदाच आला पाहिजे. प्रत्येक सरळ रेषेत आणि ३ बाय ३ च्या प्रत्येक लहान चौकात सर्व एक ते नऊ आकडे आलेच पाहिजेत. आधीच्या छापील आकड्यांची अजिबात हलवाहलव करायची नाही. प्रत्येक कोड्याला एकच उत्तर आहे.

दिनविशेष

६ मार्च

- १८४०: बाल्टिमोर कॉलेज ऑफ डेंटल सर्जरी हे पहिले दंतवैद्यकीय महाविद्यालय सुरू झाले.
- १९०२: रेआल माद्रिद फुटबॉल क्लब ची स्थापना झाली.
- १९४०: रशिया व फिनलंड मधे शस्त्रसंधी झाली.
- १९५३: जॉर्जी मॅक्सिमिलानोव्हिच सोविएत रशियाचे अध्यक्ष झाले.
- १९५७: घाना देशाचा स्वातंत्र्य दिन.
- १९६४: कॅशियस क्ले यांनी मुहम्मद अली ये नाव धारण केले.
- १९७१: भारतीय क्रिकेटपटू सुनील गावस्कर यांनी वेस्ट इंडीज विरुद्ध पहिला कसोटी सामना खेळला.
- १९७५: इराण व इराक यांच्यात सीमाप्रश्नावर संधी झाली.
- १९९२: मायकेल अँजेलो हा संगणक विषाणू पसरण्यास सुरवात झाली.
- १९९७: स्वाध्याय परिवाराचे संस्थापक पांडुरंगशास्त्री आठवले यांची टेंपलटन पुरस्कारासाठी निवड.
- १९९८: गझल गायक जगजितसिंग यांना मध्य प्रदेश सरकारतर्फे लता मंगेशकर पुरस्कार जाहीर झाला.
- १९९९: राष्ट्रपती के. आर. नारायण यांच्या हस्ते जगपप्रसिध्द खजुराहो मंदिर समूहाच्या सहस्त्राब्दी सोहळ्याचे उद्घाटन झाले.
- २०००: शहर निर्वाह भत्ता (उउअ), महागाई भत्ता (उअ) आणि घरभाडे भत्ता (लृफअ) म्हणून मिळणारी रक्कम करपात्र असल्याचे सर्वोच्च न्यायालयाचे शिक्कामोर्तब केला.
- २००५: देशातील पहिला अणुउर्जा प्रकल्प तारापुत येथे सुरु झाला.
- १४७५: इटालियन शिल्पकार आणि चित्रकार मायकेल अँजलो यांचा जन्म. (मृत्यू: १८ फेब्रुवारी १५६४)
- १८९९: चरित्रकार आणि संपादक शि. ल. करंदीकर यांचा जन्म.
- १९१५: बोहरी धर्मगुरू सैयदना मोहम्मद बहार्नुद्दिन यांचा जन्म.
- १९३७: पहिली महिला रशियन अंतराळातयात्री व्हॅलेन्तिना तेरेश्कोव्हा यांचा जन्म.
- १९४९: पाकिस्तानी राजकारणी शौकत अजिझ यांचा जन्म.

भविष्य

मेष हितशत्रूंना आवर बसेल. भरणी नक्षत्राच्या व्यक्तींना राजकीय लाभ घडतील. कृत्तिका नक्षत्राच्या व्यक्तींना शनिवार खरेदीत फसण्याचा.

वृषभ कृत्तिका नक्षत्राच्या व्यक्तींना सप्ताहारंभ नोकरीत हितशत्रू पीडेचा. १४ व १५ हे दिवस मृग नक्षत्राच्या व्यक्तींना शनिवार प्रवास.

मिथुन सप्ताह काहींना विशिष्ट वेदनेतून हैराण करणारा. बाकी सप्ताहाची सुरुवात पुनर्वसु नक्षत्राच्या व्यक्तींना वैयक्तिक उपक्रमांतून छानच.

कर्क अतिशय संमिश्र ग्रहमान राहील. पुनर्वसु नक्षत्राच्या व्यक्तींना शुक्राच्या राश्यांतराचा पुष्य नक्षत्राच्या व्यक्तींना ता. १५ हे दिवस मोठे गतिमान राहतील.

सिंह यंत्रं, वाहनं आणि कामगार या त्रिघटकांतून उपद्रव निर्माण करणारा सप्ताह. मघा नक्षत्राच्या व्यक्तींनी अपवादात्मक उद्‌भवू पाहणाऱ्या परिस्थितीचं भान ठेवावं.

कन्या बाकी सप्ताह स्वतंत्र व्यावसायिकांना चांगला प्रतिसाद देईल. हस्त नक्षत्राच्या व्यक्तींचे मोठे व्यावसायिक करारमदार होतील. व्यावसायिक भांडवल पुरवठा होईल. पुत्रचिंता जाईल.

तुला प्रेम संबंधांमध्ये अधिक जवळीक निर्माण होईल. जर तुम्हाला काही मिळवायचे असेल तर आजचा दिवस उत्तम आहे. राजकारणी लोकांच्या संपर्कामुळे तुम्हाला चांगला फायदा होऊ शकतो.

वृश्चिक फक्त आजची संध्याकाळ आणि शनिवारची संध्याकाळ वातार्लापातून सांभाळावी. प्रेमिकांनी जपून. घरात कोणाचं लग्न ठरवाल. ज्येष्ठा नक्षत्राची व्यक्ती सप्ताहात चैनीवर खर्च करेल.

धनु उत्तराषाढा नक्षत्राच्या व्यक्ती मॅन ऑफ दि मॅच होतील. मूळ नक्षत्राच्या व्यक्तींना ता. १५ हे दिवस मोठे गतिमानच राहतील. राजकीय व्यक्तींकडून लाभ. मात्र शनिवारी वेंधळेपणा टाळा.

मकर आज पार्टनर सोबत बोलताना सतर्क राहा. आज तुमची तुमच्या व्यक्तीकडे एखाद्या गोष्टीबद्दल राग व्यक्त कराल. लहान व्यावसायिकांना आज एखाद्या त्रासाला सामोरे जावे लागेल.

कुंभ शनिभ्रमणाच्या पार्श्वभूमीवर हेच सांगत आहे. बाकी ता. १४ च्या वसंत पंचमीची संध्याकाळ गाठीभेटींतून हृद्य राहील. धनिष्ठा नक्षत्राच्या व्यक्तींना धनलाभ. तरुणांचं नैराश्य जाईल.प्रेमप्रकरणातून गती मिळेल.

मीन अर्थातच जीवनात उत्तम सीक्वेन्स लागतील. उत्तराषाढा नक्षत्राच्या व्यक्तींनी सप्ताहात हट्टीपणा टाळावा. धनिष्ठा नक्षत्राच्या व्यक्तींनी सप्ताहात थट्टामस्करी टाळावी. उत्तरा-भाद्रपदा नक्षत्राच्या व्यक्तींनी सप्ताहात चुकीच्या मित्रांची संगत टाळावी.

Printed, published and owned by Rakesh Shankar Gore and printed at Somani Printing Press, unit no.04, ground floor, n.k.industrial estate, off. aarey road, near pra[illegible] ind. estate, gate no.2, goregaon (east) Mumbai-400063, and published at shop no.12, b-2, sai dham shopping center, mangal nagar, 15 no. last bus stop, near g.c.c. club, mira road (east), Dist.Thane-401107, Maharashtra. editor : Rakesh Shankar Gore. RNI.REG. NO. MAHBIL/2023/86118. Office contact no. 97023 86118, Website: www.lokrakshanay.com, Email: dainiklokrakshanay@gmail.com (ठाणे न्याय कक्षेत)

संपादकीय

विद्यार्थी वाऱ्यावर..

पायाभूत सोयीसुविधांची उभारणी प्रगतीसाठी महत्त्वाची खरीच. रस्ते, महामार्ग, अतिजलद महामार्ग, रेल्वे, वीज, विमानतळे, बंदरे यांच्या जोडीने अलीकडच्या काळात आवश्यक अशा इंटरनेट सोयीसुविधा आदी पुरवणे हे सरकारांचे कर्तव्यच. या सगळ्याचे वर्णन भौतिक सोयीसुविधा (फिजिकल इन्फ्रास्ट्रक्चर) असे करता येईल. हे आवश्यकच. पण याच्या जोडीने किंबहुना यापेक्षाही अधिक आवश्यक असतात त्या संस्थात्मक सोयीसुविधा (इन्स्टिटयूशनल इन्फ्रास्ट्रक्चर). या संस्थात्मक सोयीसुविधांतील कर्मचारी भौतिक सोयीसुविधा हाताळण्यात निर्णायक भूमिका बजावत असतात. म्हणजे महामार्ग उत्तम बांधला; पण वाहतुकीच्या प्रामाणिक नियमनासाठी मनुष्यबळ निर्माण केले नाही तर उत्तम महामार्ग बांधणीची रास्त फळे मिळत नाहीत. उत्तम शैक्षणिक सुविधा- म्हणजे चकचकीत महाविद्यालये, त्यात पंचतारांकित सुविधा इत्यादी- उभ्या केल्या. पण विद्यार्थ्यांच्या मूल्यांकनासाठी चोख परीक्षा पद्धत, उच्च दजार्ची शैक्षणिक सुविधा आणि ते शिक्षण देणारा गुणवंत अध्यापकवर्ग नसेल तर नुसत्या इमारतींचा काहीही उपयोग होत नाही. याअभावी कंत्राटदारांस कामे तेवढी मिळतात आणि ती देण्यात ज्यांचे हितसंबंध असतात त्यांचे उखळ पांढरे होते. हा आनंद तात्पुरता. कारण या सगळ्याचा उपयोग उच्च दजार्चे शिक्षण देण्यात, ते आत्मसात करून बौद्धिक आव्हाने पेलू शकणाऱ्या विद्यार्थ्यांत होणार नसेल तर भौतिक सोयीसवलती म्हणजे केवळ सांगाडे. प्राणशून्य सांगाडयांचा ज्याप्रमाणे काहीही उपयोग नसतो त्याप्रमाणे या सोयीसवलतींचा उपयोग फक्त ह्यछान दिसतेह्न इतके म्हणण्यापुरता. पुढची पिढी घडवण्यास हे सारे निरुपयोगीच. हा सारा ऊहापोह आता करण्याचे कारण म्हणजे उत्तर प्रदेशात महाभरतीसाठी आणखी एक परीक्षा रद्द करण्याची सरकारवर आलेली वेळ. ती वेळ त्या सरकारवर आली कारण संबंधित परीक्षांचे पेपर फुटले. महाराष्ट्रातही असे काही प्रकार अलीकडच्या काळात घडले. सबब या विषयाची दखल घेणे गरजेचे ठरते.अलीकडच्या काळात उत्तर प्रदेश सरकार वृत्तविषय झाले ते पोलीस कॉन्स्टेबलच्या व्यापक भरतीच्या वृत्ताने. बऱ्याच काळ्ने होणाऱ्या या भरतीत जवळपास ६० हजार पदे भरली जाणार होती आणि सुरुवातीच्या वृत्तानुसार या कनिष्ठ श्रेणीतील भरतीसाठी जवळपास ६० लाख इतके महाप्रचंड संख्येत अर्जदार होते. ही संख्या सिंगापूर देशाच्या लोकसंख्येपेक्षाही अधिक. उत्तर प्रदेशातील सार्वजनिक वाहतूक यंत्रणा या परीक्षार्थी विद्यार्थ्यांच्या गदीर्ने नुसती फुलून गेली होती. प्रत्यक्ष परीक्षादिनी या ६० लाखांतील ४८ लाख परीक्षा केंद्रांवर हजर झाले. तथापि या परीक्षार्थीस निराश होऊन परतावे लागले कारण त्यातील एक पेपर फुटल्याने सगळी परीक्षाच रद्द करण्याची नामुष्की सरकारवर आली. त्यानंतर हा प्रकार पुन्हा घडला.गेल्या शनिवारी उत्तर प्रदेशात त्या राज्याच्या लोकसेवा आयोगातील विविध पदे भरली जाणार होती. उत्तर प्रदेश लोकसेवा आयोगातील रिव्ह्यू ऑफिसर, असिस्टंट रिव्ह्यू ऑफिसर आदी पदांसाठी परीक्षा होती. अशी किती पदे रिक्त होती? तर फक्त ४११. तथापि या अवघ्या ४११ पदांसाठी १० लाख ७ हजार उमेदवारांचे अर्ज आले. यातील किती प्रत्यक्षात परीक्षा केंद्रांवर दाखल झाले याचा तपशील उपलब्ध नाही. परंतु परीक्षा सुरू होत असतानाच समाजमाध्यमांवर काही प्रश्नपत्रिका उपलब्ध झाल्या. फुकट फॉरवडीर्ची संख्या त्या राज्यातही मुबलक असल्याने हे प्रश्न सर्वदूर पसरले. अशा वेळी उत्तर प्रदेश सरकारची प्रतिक्रिया अन्य कोणत्याही सरकारप्रमाणे निघाली. सरकारने पुरावा मागितला. अनेकांनी तो सादर केला. खुद्द प्रयागराज येथे या संदर्भात निदर्शने झाली. अखेर त्याची दखल घेऊन मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांच्यावर हा दुसरा परीक्षायोगही रद्द करण्याची वेळ आली. ह्यह्यपरीक्षेच्या पावित्र्याशी छेडछाड करणाऱ्यांस योग्य तो धडा वगैरे शिकविण्याचा इशारा त्यांनी दिला. ते होईल तेव्हा होईल. पण तोपर्यंत या इतक्या साऱ्या उमेदवारांच्या नशिबी पुन्हा एकदा वाट पाहणे आले. आधीच जवळपास ४८ लाख उमेदवार ६० हजार पदांच्या भरतीकडे बुभुक्षित नजरेने पाहत आहेत. त्यात आता ही आणखी दहा लाखभरांची भर. शक्य आहे की काही उमेदवारांनी या दोन्ही परीक्षांत अर्ज भरले असतील. म्हणजे त्यांची दुहेरी उपेक्षा. इतक्या महाप्रचंड संख्येने विद्यार्थी, तरुण उपेक्षित राहत असतील तर ही परिस्थिती गंभीर मानली जायला हवी. आणि त्यातही हे राज्य उत्तर प्रदेश असेल तर अधिकच. कारण विकसित भारत चा संकल्प घेऊन पुढे निघालेले देशाचे सर्वोच्च सत्ताधीश या राज्याचे प्रतिनिधित्व करतात. तसेच हे देशातील सर्वात मोठे राज्य. समस्त युरोपीय देश जरी एकत्र आले तरी उत्तर प्रदेश त्या सर्वास भारी पडेल, अशी त्याची क्षमता. आताही भारतास पाच लाख कोटी डॉलर्सची अर्थव्यवस्था करण्याच्या केंद्रीय नेत्यांच्या मनसुब्यांत या राज्याचा वाटा अतिशय मोठा असल्याचे आपणास सांगितले जाते. उत्तर प्रदेश राज्य लवकरच कसे एक लाख कोटी डॉलर्सची अर्थव्यवस्था असलेले पहिले राज्य होईल, हेदेखील आपणावर बिबवले जात असते आणि विविध उद्योग मेळाव्यांत कित्येक लाख कोटींचे सामंजस्य करार होऊन उद्योगपतींत त्या राज्यात उद्योग स्थापन करण्यासाठी कशी अहमहमिका सुरू आहे याचेही वृत्तांत सातत्याने येत असतात. त्या राज्याची सूत्रे असलेले योगी असल्याने या सगळ्याच्या सत्यासत्यतेबाबत शंका घेण्याचे अजिबात कारण नाही. तेव्हा मुद्दा त्या राज्याच्या क्षमतेचा नाही. तो आहे फक्त त्या राज्यातील विद्यार्थ्यांच्या परीक्षा घेण्याच्या सरकारच्या क्षमतेचा. पाठोपाठ दोन महत्त्वाच्या परीक्षा केवळ पेपरफुटीमुळे रद्द करण्याची वेळ सरकारांवर येत असेल तर या परीक्षा घेण्याबाबत सरकारी क्षमतेवर प्रश्नचिन्ह निर्माण होणारच होणार. हा असा प्रकार आपल्या महाराष्ट्रातही अलीकडे घडल्याची टीका होते.

आई-वडिलांनाही मिळते पोटगी

दोन मुलींनंतर मुलगा व्हावा यासाठी आई-वडिलांनी नवसाचा गणपती बसवला, देवकृपेने मुलगा झालादेखील. मुलाचे छान शिक्षण करून दिले, मुलाच्या आवडीची मुलगी बघून लग्नदेखील करून दिले. आजकाल कष्टाने मोठी केलेली मुले-मुलीदेखील आपल्या आई-वडिलांना वाऱ्यावर सोडतात. त्यांच्या उदरनिर्वाहाची, औषधपाण्याची विचारपूस करत नाहीत. अशावेळी पालक न्यायालयाचे दरवाजे ठोठावून पोटगी मिळण्यासाठी दाद मागू शकतात. त्याविषयी. दोन मुलींनंतर मुलगा व्हावा यासाठी आई-वडिलांनी नवसाचा गणपती बसवला, देवकृपेने मुलगा झालादेखील. मुलाचे छान शिक्षण करून दिले, मुलाच्या आवडीची मुलगी बघून लग्नदेखील करून दिले.

आई-वडिलांचे कर्तव्य संपले. आता मुलगा, सून, नातवंडे यांच्यासोबत छान सुखाचे दिवस जगण्याचे त्यांचे दिवस आले. परंतु होत्याचे नव्हते झाले; एका वर्षाच्या आतच सुनेमध्ये आणि आई-वडिलांमध्ये छोटे छोटे वाद होऊ लागले.

सुनेने मुलाला आई-वडिलांविरुद्ध कान भरायला सुरुवात केली आणि बघता बघता मुलाने आई-वडिलांचे घर अगदी एका दिवसातच सोडले.

...मग गणपती बसवायची वेळ आली. आई-वडिलांनी मुलाला फोन केला, तर त्याने चक्क उत्तर दिले, ह्यह्यमी गणपती बसवायला येणार नाही आणि तुम्हाला जमत नसेल तर प्रथा बंद करा. हे ऐकून आई-वडिलांना धक्काच बसला. वडिलांना जेमतेम पाच हजार रुपये पेन्शन होती. त्यात उभयतांचे भागत नव्हते, म्हणून मुलाला काही आर्थिक मदत करण्यास सांगितले. तेव्हा मुलाने, मला परत फोन करू नका. माझा तुमचा काही संबंध नाही, असे उत्तर दिले. नातेवाईकांचा सल्ला घेऊन आई-वडिलांनी मुलाविरुद्ध न्यायालयात जाण्याचा निर्णय घेतला. निर्णय घेत असताना समाज काय म्हणेल? याची मोठी भीती वाटत होती. परंतु औषधोपचाराला पैसे नसल्याने म्हातारपणाचा आधार असलेल्या मुलाकडे पैसे मागण्याशिवाय पर्याय नव्हता. यासाठी न्यायालयीन व कायद्याची मदत घ्यावी लागली.

मुलांविरुद्ध कोर्टात जाता येते?

आई-वडिलांना मुले सांभाळत नसतील किंवा आर्थिक मदत करत नसतील तर आपल्या मुलाच्या किंवा मुलीच्या विरुद्ध न्यायालयामध्ये पोटगीसाठी विविध कायद्यांतर्गत दावा दाखल करू शकतात. वयोवृद्ध आई-वडिलांची मुलेही वृद्ध असून त्यांनादेखील काही उत्पन्नाचे साधन नसेल; तर असे वयस्कर ज्येष्ठ नागरिक आपल्या नातवंडांकडे ही पोटगी मागू शकतात.

कोणत्या कायद्याच्या तरतुदीखाली आई-वडिलांना पोटगी मिळू शकते? सर्वात प्रथम ज्येष्ठ नागरिकांचा निर्वाह व कल्याण अधिनियम २००७ अंतर्गत ज्येष्ठ नागरिक जे साठ वयापुढे आहेत, ते पोटगीसाठी दावा दाखल करू शकतात. तसेच फौजदारी प्रक्रिया संहितेनुसार कलम १२५ नुसार कोणत्याही धर्माचे आई-वडील मुलांकडे पोटगीसाठी दावा दाखल करू शकतात. कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण कायद्यांतर्गत ज्येष्ठ महिला (आई, आजी) या आपल्या मुलांकडे पोटगी मागू शकतात.

आई, वडील व ज्येष्ठ नागरिक यांच्या हक्कांचे संरक्षण करण्यासाठी, त्यांना सन्मानाने आयुष्य व्यतीत करता यावे, या उद्देशाने आई-वडील व ज्येष्ठ नागरिकांचा निर्वाह व कल्याण अधिनियम २००७ मध्ये अंमलात आला आहे. सर्व दाव्यांमध्ये पोटगी मिळू शकते.

काही शंकांचे निरसन

अपत्य म्हणून केवळ मुलगाच गणला जातो का? नाही! अपत्य म्हणून मुलगा व मुलगी या दोघांचाही समावेश आहे. एवढेच नव्हे तर दत्तक मुलगा/मुलगी हीदेखील अपत्ये मानली जातात. वय वर्षे अठरापुढे असणाऱ्या अपत्याकडे पोटगी मागता येते. नक्की पोटगी कशासाठी मागता येते? पोटगीची रक्कम ही अन्न, वस्त्र, निवारा, त्याचप्रमाणे वैद्यकीय उपचारांसाठी मागता येते. निर्वाह या व्याख्येत अन्न, वस्त्र, निवारा, वैद्यकीय शुश्रूषा व उपचार यासाठीची तरतूद असा समावेश होतो.

पोटगीची रक्कम कशी ठरवली जाते? पोटगी ठरवण्याच्या प्रक्रियेमध्ये २०२२ पासून काही विशेष बदल करण्यात आले आहेत. सर्वोच्च न्यायालयाच्या मार्गदर्शक तत्त्वांप्रमाणे पोटगी मागणाऱ्या अर्जदाराने स्वतःच्या बँकखात्याचे स्टेटमेंट तसेच स्वतःच्या नावावर असलेल्या मालमत्ता व स्वतःवर असलेल्या जबाबदाऱ्या या न्यायालयाकडे मांडायच्या आहेत.

तसेच पोटगी कशासाठी मागत आहोत यासंदर्भातला पुरावा देणे गरजेचे आहे. पोटगी ज्याच्याकडे मागत आहेत, अशा मुलाने देखील स्वतःचे तीन वर्षांचे बँक स्टेटमेंट स्वतःच्या मालमत्ता व जबाबदाऱ्या कोर्टात सांगणे व त्याचे पुरावे देणे बंधनकारक आहे. दोन्ही बाजूंची कागदपत्रे तपासल्यावर मुलांचे दरमहा उत्पन्न आणि आई-वडिलांच्या मूलभूत गरजा यांचा सारासार विचार करून न्यायालय पोटगीची रक्कम ठरवते.

पोटगी नाहीच दिली तर...

पोटगीची रक्कम ठरवल्यावर देखील पोटगी नाही दिली तर काय होते? न्यायालयाने पोटगीचा अर्ज मंजूर करून पोटगीची रक्कम ठरवल्यास ती भरणे व अर्जदारांना देणे हे मुलांवर बंधनकारक आहे. पोटगी न दिल्यास आई-वडील न्यायालयात पुन्हा अर्ज करू शकतात; जेणेकरून न्यायालय मुलांना वॉरंट काढू शकते व अटक करू शकते किंवा मुलांची स्वकष्टार्जित मालमत्ता असल्यास अशा मालमत्तेवर जप्ती आणली जाऊ शकते. पोटगी मिळण्यासाठी न्यायालयात किती दिवस लागू शकतात? भारतीय न्यायव्यवस्था ही अतिभारीत असून यामध्ये थोडा कालावधी लागू शकतो. परंतु ज्येष्ठ नागरिकांकरता जलद न्याय देण्याची व्यवस्था कायद्यामध्ये असल्यामुळे ज्येष्ठ व्यक्तींचे दावे लवकरात लवकर निकाली काढले जातात.

एकदा न्यायालयाने ठरवलेल्या पोटगीच्या रकमेमध्ये बदल होऊ शकतो का? न्यायालयाने ठरवलेल्या पोटगीच्या रकमेमध्ये पक्षकारांची परिस्थितीमध्ये बदल घडल्यास बदल होऊ शकतो किंवा न्यायालयाने ठरवलेली पोटगी कमी वाटत असल्यास अर्जदार तीस दिवसांच्या आत अपील दाखल करू शकतात. कायदे व न्यायव्यवस्था हे सर्व काही आई-वडिलांच्या किंवा ज्येष्ठ नागरिकांच्या संरक्षणासाठी व कल्याणासाठी काम करते. लवकरात लवकर न्याय मिळवून देण्याचा प्रयत्न देखील करते. परंतु आई-वडिलांनी दिलेला जन्म, संस्कार, शिक्षण याची जाणीव ठेवून मुलांनी त्यांच्या गरजांचा विचार करून आपल्या आई-वडिलांवर न्यायालयात जाण्याची वेळ येणार नाही, असे वागावे. आई-वडिलांना आपल्या मुलांविरुद्ध न्यायालयात जावे लागते, यापेक्षा कोणतेही मोठे दुःख असू शकत नाही.

डोंबिवलीत सेक्स रॅकेटचा पर्दाफाश

डोंबिवली : डोंबिवलीतील मानपाडा रस्त्यावरील एका हायप्रोफाईल सोसायटीत मसाज सेंटरच्या नावाखाली चालवल्या जाणाऱ्या सेक्स रॅकेटचा अनैतिक मानवी तस्करी प्रतिबंधक कक्षाच्या अधिकाऱ्यांनी पर्दाफाश केला आहे. या प्रकरणात नवी मुंबईतील उलवे येथील मसाज पार्लर चालवणाऱ्या आरोपी दलाल महिलेविरुध्द पोलिसांनी टिळकनगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे.आरोपी महिला दलाल ही हायप्रोफाईल सोसायटी असलेल्या शंखेश्वर गृह संकुलात संस्कृती ब्युटी आणि मेडी स्पा नावाने मसाज पार्लर चालवत होती. या पार्लरमधून दोन पीडित महिलांची पोलिसांनी सुटका केली. या महिलांच्या घरची आर्थिक परिस्थिती बेताची असल्याने शरीरविक्रय व्यवसायात उतरल्या होत्या, असे पोलीस तपासात समोर आले आहे.ठाणे येथील अनैतिक मानवी व्यापार प्रतिबंधक कक्षाच्या वरिष्ठ पोलीस निरीक्षक चेतना चौधरी यांना शुक्रवारी एका अनोळखी व्यक्तीने संपर्क साधला. डोंबिवलीतील मानपाडा रस्त्यावरील शंखेश्वर गृहसंकुलाच्या एका सदनिकेत मसाज पार्लरच्या नावाने वेश्या व्यवसाय चालवला जात आहे, अशी माहिती दिली. संस्कृती ब्युटी आणि मेडी स्पा नावाने हे पार्लर चालवले जात होते . या माहितीच्या आधारे वरिष्ठ पोलीस निरीक्षक चेतना चौधरी, साहाय्यक पोलीस निरीक्षक दीपक वालगुडे आणि त्यांच्या पथकाने टिळकनगर पोलीस ठाण्याच्या उपनिरीक्षक ममता मुंजाळ यांच्या सहकार्याने त्या मसाज पार्लरवर छापा टाकला.या पथकातील अधिकाऱ्यांनी बनावट ग्राहक पाठवून तेथे खरेच अनैतिक व्यवसाय चालतो का? याची आधी खात्री केली. बनावट ग्राहक पोलिसांनी खुणा करून दिलेले पैसे घेऊन पार्लरमध्ये गेला. पार्लरमध्ये जाताच त्याच्याकडून २ ५०० रुपये घेण्यात आले. त्याच्या मागणीप्रमाणे शरीरसुखासाठी एक महिला त्याला उपलब्ध करून देण्यात आली. यानंतर बनावट ग्राहकाने खोलीतून पोलिसांना मोबाईलवर संपर्क करून इशारा करताच पथकाने मसाज पार्लरवर धाड टाकली. त्यावेळी तेथे दोन पीडित महिला आढळून आल्या.कारवाईच्या ठिकाणी ७ हजार रुपयांची रोकड व इतर साधने आढळून आली. ती पोलिसांनी जप्त केली. मसाज पार्लर चालकानं अनैतिक मानवी व्यापार प्रतिबंधक कायद्याचा भंग केल्यानं पोलिसांनी मसाज पार्लर चालक महिलेच्या च्या विरुध्द गुन्हा दाखल केला आहे.

विद्यार्थिनीच्या विनयभंग प्रकरणी कामाठीला अटक

शहापूर: शहापूर एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्पाच्या अखत्यारितील तालुक्यातील शासकीय आश्रमशाळेत शिक्षण घेणाऱ्या अल्पवयीन विद्यार्थीनीच्या विनयभंग प्रकरणी शहापूर पोलीसांनी आश्रमशाळेत कामाठी म्हणून कार्यरत असलेल्या गणपत झिपर गवळी (५७) याला अटक केली आहे. त्याला न्यायालयीन कोठडी सुनावण्यात आली.

पोलिसांकडून आधारवाडी कारागृहात रवानगी करण्यात आली आहे. घडलेल्या गुन्ह्याची माहिती उशीरा दिल्यामुळे मुख्याध्यापक जगन्नाथ नामदेव घायवट यांच्या विरुद्ध देखील गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या गुन्ह्यात त्यांच्यावरही कारवाई होऊ शकते,असे संकेत पोलीसांनी दिले आहेत.

सायंकाळी जेवणाच्यावेळी विद्यार्थीनी स्वयंपाकघराच्या कोठीत कांदा आणण्यासाठी गेली असता तेथे कामाठी म्हणून कार्यरत असलेल्या गणपत गवळी याने विनयभंग केल्याचे पोलीसांनी सांगितले.

या गुन्ह्याच्या पार्श्वभूमीवर शहापूर तालुक्यातील शासकीय तसेच अनुदानित आश्रमशाळेच्या मुख्याध्यापकांची व आदिवासी विकास प्रकल्प कार्यालयातील अधिकाऱ्यांची पोलीस उपअधिक्षक मिलिंद शिंदे यांनी सोमवारी दुपारी तातडीने बैठक घेऊन आश्रमशाळेतील अशा घटनांना आळा घालण्यासाठी उपाययोजना आखण्याच्या सूचना दिल्या आहेत.

◆दरम्यान, विनयभंगातील आरोपी असलेल्या कामाठी गणपत गवळीवर निलंबनाची कारवाई करण्यात येणार असल्याची व शिवाय चौकशीअंती या प्रकरणात दोषी आढळल्यास मुख्याध्यापक जगन्नाथ घायवट यांच्या निलंबनाचाही प्रस्ताव पाठवण्यात येईल, असे आदिवासी विकास प्रकल्प कार्यालयाच्या अधिकाऱ्यांकडून सांगण्यात आले आहे.

Shiv Sena UBT leader booked under UAPA for partying with Dawood's aide

Mumbai: The Nashik police has registered an offence under the stringent Unlawful Activities (Prevention) Act (UAPA) against Shiv Sena (UBT) leader Sudhakar Badgujar after he was seen partying with Salim Kutta, a close aide of Dawood Ibrahim and a convict in the 1993 serial bomb blast case, an official said, reported news agency ANI. Shiv Sena UBT leader booked under UAPA: 'Police have information that money was given in the party' Meanwhile, the spokesperson and deputy leader of Shiv Sena Sheetal Mhatre on Thursday claimed that the police have information that money was given in the party and added that all this will come out in the investigation. "The case involving Shiv Sena UBT spokesperson's close associate and the Nashik district president, Sudhakar Badgujar, partying with Salim Kutta, a close aide of Dawood Ibrahim, has been filed. What was Sudhakar doing with Salim Kutta, the 1993 Mumbai blasts accused? In this party, the police have information that money was given,Who gave the money to Sudhakar Badgujar...? Why did he give this money to Salim? ...All this will come out in the investigation..." she said, reported ANI.

Pod taxi service to be launched for easy commute to Bandra-Kurla Complex

Mumbai : The Maharashtra government Tuesday announced that a pod taxi service will be launched to ease commute to the business hub of Bandra-Kurla Complex. The Mumbai Metropolitan Region Development Authority (MMRDA) has approved a pod taxi service on the 8.8 km route between Bandra and Kurla railway stations, the chief minister's office said in a release. With a capacity of six passengers each, the pods will run at the speed of 40 km per hour and will have 38 halts, it stated. The project will be implemented on a public-private partnership basis and will ease the commute to BKC from the two railway stations. Maharashtra Chief Minister Eknath Shinde's office posted on X, "'Pod taxi' will run between Bandra and Kurla station through Bandra-Kurla complex and its distance is 8.80 km. That's it. It will have 38 stations. It has a capacity of six passengers per pod. Maximum 40 Km. The Chief Minister @ mieknathshinde today approved the launch of this project on a Public-Private Partnership basis, which will have a speed of 1 hour per hour. This project will help make the journey from Bandra station to BKC more convenient." Meanwhile, the civic-run Brihanmumbai Electric Supply and Transport (BEST) undertaking has revised its bus pass rates from March 1, the BEST undertaking said on Thursday. The revised rate of the daily and monthly unlimited journey pass will be Rs 60 and Rs 900, respectively, up from the existing Rs 50 and Rs 750, the city's premier road transport entity said in a release. "The bus pass rates were revised to overcome the problem of loose change, avoid the insecurity of daily cash handling, facilitate passengers to avail the undertaking's scheme and to increase income," an official said. No change has been made in the rate, validity and unlimited number of journeys of student passes that cost Rs 200, and the Rs 50 concession in various bus passes for senior citizens, excluding weekly passengers, has also not been changed, the release said.

Elderly Thane woman hangs self; 'suicide note' accuses son, daughter-in-law of mental harassment

Mumbai: A 61-year-old woman hanged herself to death at her home in Maharashtra's Thane city. The woman's alleged suicide note mentioned her son and daughter-in-law's mental harassment as the reason behind her drastic action. The woman ended her life on March 2, newswire PTI reported, following which the police registered a case of abetment to suicide against her daughter-in-law and son. The complaint in this connection was lodged by the victim's daughter, according to the police. "The victim, identified as Sushma Vilas Khairnar, left a 12-page suicide note that the police recovered from her residence, where she lived with her son Rahul and daughter-in-law

Gauri," senior inspector of Naupada police station Abhay Mahajan said. The accused duo got married in 2014 and the victim resided with them, he said. "As per her note and the complaint, the relationship between the accused and the woman was strained. Her daughter-in-law and son had barred the woman from moving freely in the house, among other things. One day, the couple even asked her to leave the house and start living in a senior citizen's home," he said. The woman used to tell her ordeal to her daughter who lived somewhere else. On Mach 2, she again called her and urged her to rescue her from the couple's clutches, saying she faced threat to life. Her daughter assured that she would meet her the next day. However, the victim hanged herself from the ceiling soon after that, the police said. The woman was later taken to a hospital, where the doctors declared her dead, the police said. The accused were booked under Indian Penal Code (IPC) sections 306 (abetment to suicide), 504 (intentional insult with intent to provoke breach of the peace) and 506 (criminal intimidation) and 34 (common intention), they added. Meanwhile, the body of a 12-year-old boy, who was missing for over a month from his residence in Mumbai's Wadala area, was found on Monday evening, police said.

बनावट कागदपत्रांद्वारे सरकारी वकील म्हणून नियुक्ती

गुन्हा दाखल : परमबीर सिंह प्रकरणी नवा ट्विस्ट

मुंबई : मुंबईचे माजी पोलीस आयुक्त परमबीर सिंह यांच्यावर भ्रष्टाचाराच्या आरोपांनी गाजलेल्या प्रकरणांमध्ये आता आणखी एक नवीन ट्विस्ट आला आहे. बांधकाम व्यावसायिक संजय पुनामीया यांनी त्यांच्याविरोधातील काही प्रकरणांमध्ये नेमणूक नसतानाही ॲड. शेखर जगताप हे विशेष सरकारी वकील म्हणून उपस्थित राहिल्याचे उघडकीस आणले आहे. गृहविभागातील तत्कालीन उपसचिव किशोर भालेराव यांच्याशी संगनमत करून बनावट कागदपत्र तयार करत हा सर्व प्रकार घडवून आणल्याचा आरोप संजय पुनामीया यांनी करीत ॲड. शेखर जगताप, श्यामसुंदर अग्रवाल, शरद अग्रवाल, किशोर भालेराव यांच्याविरोधात कुलाबा पोलीस ठाण्यात तक्रार दिली आहे. त्यानुसार गुन्हा दाखल करण्यात आला असून याप्रकरणी किशोर भालेराव यांचे निलंबन करण्यात आले आहे. या संपूर्ण प्रकरणाची उच्चस्तरीय गोपनीय चौकशी करण्यात येत आहे.

मरिन ड्राईव्ह येथे राहणारे बांधकाम व्यावसायिक संजय पुनामीया यांनी पोलिसांत दिलेल्या फिर्यादीनुसार, त्यांनी एका प्रकरणात जुहू पोलीस ठाण्यात १७ फेब्रुवारी २०२१ रोजी दिलेल्या तक्रारीवरून कुख्यात मोस्ट वॉण्टेड अंडरवर्ल्ड

डॉन दाऊद इब्राहिमचा खास हस्तक छोटा शकील याच्यासह बांधकाम व्यावसायिक श्यामसुंदर अग्रवाल आणि अन्य आरोपींविरोधात गुन्हा दाखल केला होता. हा गुन्हा पुढील तपासासाठी गुन्हे शाखेकडे वर्ग करण्यात आला. गुन्ह्यातील आरोपी श्यामसुंदर अग्रवाल यांच्या तक्रारीवरून जुलै २०२१ रोजी बांधकाम व्यावसायिक संजय पुनामीया यांच्याविरोधात मरिन ड्राईव्ह पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला. त्यानंतर आणखी एक गुन्हा दाखल होऊन हा गुन्हा पुढील तपासासाठी सायबर, वरळी येथे वर्ग करण्यात आला आहे.

दरम्यान, संजय पुनामीया यांच्याविरोधात ठाणे नगर पोलीस ठाण्यात दाखल गुन्ह्यात दोषारोपपत्र सादर करण्यात आले असून कोपरी पोलीस ठाण्यात दाखल गुन्हा सीबीआयकडे वर्ग करण्यात आला आहे. बांधकाम व्यावसायिक संजय पुनामीया यांना मरिन ड्राईव्ह पोलीस ठाण्यात दाखल गुन्ह्यात अटक करण्यात आली होती. यावेळी श्यामसुंदर अग्रवाल यांच्या वतीने ॲड. शेखर जगताप हे खासगी वकील न्यायालयात हजर झाले. दुसऱ्या सुनावणीच्या वेळी ते विशेष सरकारी वकील म्हणून न्यायालयात हजर झाले. ॲड. शेखर जगताप यांची मरिन ड्राईव्ह पोलीस ठाणे आणि गुन्हे शाखेकडे तपास असलेल्या गुन्ह्यात विशेष सरकारी वकील म्हणून नेमणूक करण्यात आल्याचे त्यांनी सादर केलेल्या पत्रात नमूद होते. ॲड. शेखर जगताप यांची किल्ला कोर्ट येथेच विशेष सरकारी वकील म्हणून नेमणूक करण्यात आली होती. आदेशामध्ये त्यांची सत्र न्यायालय किंवा उच्च न्यायालय येथे विशेष सरकारी वकील म्हणून काम पाहतील, असे कोठेही नमूद केलेले नव्हते. त्यानंतर मरिन ड्राईव्ह पोलीस ठाण्यात दाखल गुन्ह्यातील एक आरोपी अकबर पठाण यांनी गुन्हा रद्द करण्यासाठी उच्च न्यायालयात धाव घेतली होती. उच्च न्यायालयात २५ ऑगस्ट २०२१ रोजी झालेल्या सुनावणी वेळी ॲड. शेखर जगताप हे महाराष्ट्र शासनाच्या वतीने विशेष सरकारी वकील म्हणून उपस्थित राहिले. त्यानंतर गुन्हे शाखेकडील तपास गुन्हे अन्वेषण विभागाकडे वर्ग करण्यात आला. गुन्ह्याच्या अनुषंगाने तपास अधिकाऱ्याने मुंबई सत्र न्यायालयात अर्ज दाखल करून छोटा शकीलच्या आवाजाचे नमुने मिळण्यासाठी विनंती केली होती. अर्जाच्या ५ जानेवारी २०२२ रोजी झालेल्या सुनावणी वेळी ॲड. शेखर जगताप हे त्यांच्याकडे कोणतीही परवानगी नसताना महाराष्ट्र शासनाच्या बाजूने बचावासाठी अर्ज केला होता. अर्जाच्या अनुषंगाने पुन्हा ॲड. शेखर जगताप यांनी विशेष सरकारी वकील नसताना विशेष सरकारी म्हणून न्यायालयाला अहवाल सादर केला होता. यावरून ॲड. शेखर जगताप हे गुन्ह्याच्या तपासामध्ये अडथळे निर्माण करून आरोपी श्यामसुंदर अग्रवाल यास सहाय्य होईल, या दृष्टीने प्रयत्न करत असल्याचे स्पष्टपणे दिसून येत असल्याचा आरोप संजय पुनामीया यांनी केला आहे. कोपरी पोलीस ठाण्यात दाखल गुन्ह्यात संजय पुनामीया यांनी अटक पूर्व जामीन मिळण्यासाठी दाखल केलेल्या अर्जाला ॲड. शेखर जगताप यांनी विशेष सरकारी वकील म्हणून विरोध केला. पुढे संजय पुनामीया यांना अटक झाली. त्यानंतरही न्यायालयातील वेगवेगळ्या सुनावण्यांवेळी ॲड. शेखर जगताप हे विशेष सरकारी वकील म्हणून हजर होत होते. ॲड. शेखर जगताप हे वेगवेगळ्या न्यायालयांमध्ये विशेष सरकारी वकील म्हणून हजर होत असल्याने संजय पुनामीया यांना संशय आला. श्यामसुंदर अग्रवाल, शरद अग्रवाल अन्य आरोपींनी गृह विभागाचे उपसचिव किशोर भालेराव यांच्याशी संगनमत करून विशेष सरकारी वकील असल्याची खोटी व बनावट कागदपत्रे तयार करून ती कागदपत्रे बार कौन्सिल येथे सादर करून फसवणूक केली. तसेच विशेष सरकारी वकील असल्याचे भासवून शासनाची आर्थिक फसवणूक केली. आपली जनमासातील प्रतीमा मलीन करीत आर्थिक नुकसान केले आहे, असा आरोप संजय पुनामीया यांनी केला आहे.

संजय पुनामीया यांनी गृह विभागाकडे माहिती अधिकार कायद्याखाली अर्ज दाखल केला. त्यावर मिळालेल्या माहितीत ॲड. शेखर जगताप हे त्यांची नेमणूक नसतानाही बेकायदेशीरपणे या प्रकरणांमध्ये विशेष सरकारी वकील म्हणून उपस्थित राहात असल्याची धक्कादायक माहिती समोर आली.

अखेर संजय पुनामीया यांनी ॲड. शेखर जगताप यांच्याविरुद्ध एप्रिल २०२३ मध्ये बार कौन्सिल येथे तक्रार दाखल केली. तक्रार अर्जाच्या अनुषंगाने ॲड. शेखर जगताप यांनी बार कौन्सिल यांच्याकडे म्हणणे सादर केले.

ॲड. शेखर जगताप यांनी नमूद प्रकरणांमध्ये विशेष सरकारी वकील म्हणून हजर राहण्याची परवानगी होती, असा दावा करत नेमणूक केली असल्याबाबतची गृह विभागाची तीन पत्रे सोबत जोडली होती. त्यामध्ये फक्त गुन्ह्यांचे क्रमांक वेगळे होते; परंतु त्यावरील जावक क्रमांक आणि तारीख एकच होती.

ॲड. शेखर जगताप यांच्यावरील संशय अधिक बळावल्याने संजय पुनामीया यांनी गृह विभागाकडे माहिती अधिकार अर्ज दाखल केला.

किशोर भालेराव यांची सही असलेल्या पत्रावर ॲड. शेखर जगताप याची विशेष सरकारी वकील म्हणून नेमणूक करण्यात आल्याच्या माहितीत नस्ती आढळून येत नसल्याचे नमूद केले गेले. त्यानंतर संजय पुनामीया यांनी सर्व गुन्ह्यांची माहिती मागवली. त्यात ॲड. शेखर जगताप हे बेकायदेशीररीत्या अन्य न्यायालयांत हजर राहिल्याचे समोर आले.

रोहित्रांची चोरी करणाऱ्यांना अटक

शहापूर: महावितरण कंपनीच्या शहापूर तालुक्यातील गावांच्या वीजपुरवठ्यासाठी बसवलेल्या वीजरोहीत्रांमधील तांब्याची तार व ऑईल अशी सव्वा लाख रुपयांच्या मालाची चोरी करणाऱ्या ६ जणांच्या टोळक्याला शहापूर पोलीसांनी मोठया शिताफीने जेरबंद केले आहे. याबाबत वीजवितरण कंपनीच्या सहाय्यक अभियंता आदित्य जोशी यांनी तक्रार दाखल केली होती. या चोरीबाबत शहापूर पोलीसांना चोरट्यांची खबर मिळाल्यानंतर पोलीस ठाण्यातील पोलीस नाईक विकास सानप, शशिकांत पाटील, मंजूर शेख, रमेश नलावडे, कमलाकर शिरोसे आदींच्या शोध पथकाने अंदाड येथील दोऱ्याचा पाडा येथे सापळा लावून ६ जणांच्या मुसक्या आवळल्या आहेत.

अज्ञात चोरट्याने रिक्षा चोरली

ठाणे : गडकरी रंगायतन शेजारच्या स्व. मारोतराव शिंदे तरणतलाव शेजारी फूटपाथला रिक्षा लावून पोहण्यास गेले असता गुरुवारी सकाळी पहाटे अज्ञात चोरट्याने रिक्षा पळवली. याप्रकरणी शनिवारी तक्रारदार सुधीर चव्हाण (५९) यांनी नौपाडा पोलीस ठाण्यात अज्ञात चोरट्याविरोधात गुन्हा दाखल केला आहे. तक्रारदार सुधीर चव्हाण (५९, रा.१३/ विठ्ठल निवास हनुमान मंदिराजवळ, शिवाजी नगर, वागळे इस्टेट, ठाणे) हे रोज सकाळी ६ ते ७ वाजता तरण तलावात पोहण्यासाठी मित्र संजय भुजबळ यांसह येतात. २९ फेब्रुवारी रोजी पहाटे ५.३० ते ६ च्या सुमारास तक्रारदाराची रिक्षा स्व. मारोतराव शिंदे तरणतलावच्या गेटलगत फूटपाथला लागून पार्क करून पोहण्यासाठी आत गेले. ही रिक्षा अज्ञात चोरट्याने चोरून नेली. तक्रारदार चव्हाण बाहेर आल्यानंतर रिक्षा पार्क केलेल्या जागेवर रिक्षा आढळली नाही. त्यांनी रिक्षाचा शोध घेतला, मात्र ती आढळली नाही.

गहाळ झालेला लाखोंचा ऐवज सापडला

ठाणे : ठाणे स्थानकाबाहेरील गावदेवी येथील शेअर रिक्षामधून लोकमान्य नगर येथे जाणाऱ्या कुटुंबाची गहाळ झालेली सोन्याच्या दागिन्यांची बॅग पोलीस उपनिरिक्षक प्रविण जाधव यांच्यामुळे सुखरूप परत मिळाली आहे. ठाण्यातील लोकमान्य नगर पाडा नंबर ३ येथे राहणाऱ्या स्वाती जीवन सांगळे या आई, भाऊ व मामा - मामी २८ फेब्रु. रोजी सोलापूरहून रेल्वेने ठाणे स्थानकात उतरल्या. गावदेवी रिक्षा स्थानक येथून शेअर रिक्षाने प्रवास करत असताना त्यांच्याकडील किंमती ऐवजाची बॅग रिक्षामध्ये राहिली होती. बॅगेमध्ये लाखो रूपयांचा मुद्देमाल होता. तो पोलिसांनी परत केला.

सात सराईत चोरट्यांना अटक

डोंबिवली : मानपाडा पोलीस ठाण्याच्या हद्दीत घरफोडी, सोनसाखळी चोरी, रिक्षा चोरीच्या घटनांमध्ये वाढ झाली होती. या पार्श्वभूमीवर मानपाडा पोलिसांच्या पथकाने तपास करत सात सराईत चोरट्यांना बेड्या ठोकल्या. पोलिसांनी संशयितांकडून सात रिक्षा, सोन्या-चांदीचे दागिने व रोख रक्कम हस्तगत केल्याची माहिती डोंबिवलीचे सहाय्यक पोलीस आयुक्त सुनील कुराडे यांनी दिली. कल्याण-डोंबिवली व उल्हासनगर परिसरातील रिक्षा चोरून विकण्याच्या तयारीत असलेल्या दोघा चोरट्यांना मानपाडा पोलिसांनी बेड्या ठोकून गजाआड केले. या दोघांना पोलिसांनी डोंबिवलीतील टाटा नाका येथून अटक केली. त्यांच्याकडून सात रिक्षा हस्तगत करण्यात पोलिसांना यश आले आहे. तसेच घरफोडी करणाऱ्या एकाला आणि तीन सोनसाखळी चोरट्यांना देखील पोलिसांनी बेड्या ठोकल्या आहेत. नासीर हुसेन पठाण (३०, रा. कल्याण) व शाहरुख बुडन शहा (२८, रा. संभाजीनगर, जालना) अशी अटक केलेल्या रिक्षा चोरट्यांची नावे आहेत. मोटर वाहन चोरीच्या वाढत्या तक्रारीवरून मानपाडा पोलिसांनी रेकॉर्डवरील गुन्हेगारांची माहिती काढत असताना पोलीस हवालदार राजेंद्र खिलारे यांनी माहिती मिळवून २८ फेब्रुवारी रोजी दोघांना अटक केली. या दोघांकडून ३ लाख ७० हजार रुपये किमतीच्या सात रिक्षा हस्तगत करण्यात आल्या असून पाच गुन्हे उघडकीस आले आहेत. मानपाडा पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक विजय कादबाने

यांनी गुन्हे प्रकटीकरण पथकातील पोलीस अधिकारी व पोलीस अंमलदार यांचे विशेष पथक बनवून सीसीटीव्ही कॅमेऱ्याच्या फुटेजवरून व माहितीच्या आधारे घरफोडी गुन्ह्यातील आरोपी अफताफ ईशशाद मोमीन (३३) याला भिवंडी येथून अटक केली. अफताफने त्याचा साथीदार तैसीफ अन्सारी याच्याबरोबर केलेल्या चार घरफोड्यांचे गुन्हे उघडकीस आले आहेत. पोलिसांनी अटक आरोपीकडून १२ ग्रॅम वजनाचे ४८ हजार रुपये किमतीचे सोन्याचे कॉईन, ५२ ग्रॅम वजनाचे चांदीचे कॉईन व रोख रक्कम आठ हजार रुपये आणि १ मोबाईल फोन असे एकूण ५९ हजार रुपये किमतीचा मुद्देमाल हस्तगत केला आहे. स्वप्नील हरीश माधवानी ऊर्फ करकट्या बाबू (१८, रा. कळवा), जावेद झाकीर शेख (२३, रा. मुंब्रा) आणि इरफान सिद्दीक शेख (२२, रा. कळवा) असे सोनसाखळी चोरीच्या गुन्ह्यातील तीन चोरट्यांची नावे आहेत. २० जानेवारी रोजी रात्री डोंबिवली पूर्व येथील ज्येष्ठ महिला आपल्या नातवासोबत उसाचा रस पिण्यासाठी उभी असताना या तिघांनी पाठीमागून येऊन त्यांच्या गळ्यातील १ लाख ८० हजार रुपये किमतीचे दोन सोन्याचे हार खेचून पसार झाले. याप्रकरणी मानपाडा पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदवला होता. पोलिसांनी अटक केलेल्या तिघा चोरट्यांकडून ३० ग्रॅम वजनाच्या सोन्याच्या दोन चेन, १० ग्रॅम वजनाची सोन्याची अर्धवट तुटलेली चेन असा एकूण १ लाख २० हजार रुपये किमतीचा मुद्देमाल हस्तगत केला. या गुन्ह्यातील आणखी एका आरोपीचा पोलीस शोध घेत आहेत. या आरोपींवर टिळकनगर, डोंबिवली, कळवा, चितळसर पोलीस ठाण्यांत आठ गुन्हे दाखल आहेत. डोंबिवली पूर्वेकडील दावडी येथे १ लाख १५ हजार रुपये किमतीचा मुद्देमाल चोरीला गेल्याची घटना घडली होती. याप्रकरणी मानपाडा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल होता. या गुन्ह्याचा तपास करताना पोलिसांनी भंगारचा धंदा करणारा राहुल नागेश घाडगे (२५, रा. कल्याण पूर्व) याला अटक केली. पोलिसांनी त्याच्याकडून ५ ग्रॅम वजनाची एकूण २ सोन्याची मंगळसूत्र, ७ ग्रॅम वजनाचे एकूण २ सोन्याचे कानातील झुमके, रिंग असे एकूण ६० हजार रुपये किमतीचा मुद्देमाल हस्तगत केला. राहुलवर कल्याण रेल्वे, कोळसेवाडी, बदलापूर पोलीस ठाण्यात एकूण ९ गुन्हे दाखल असल्याची माहिती पोलिसांनी दिली.

गोदामात चोरी करून आग लावणाऱ्यांना बेड्या

उरण : उरण तालुक्यातील विंधणे ग्रामपंचायत हद्दीतील कंठवली येथील सामवेदा लॉजिस्टिक इन्फ्रा रिसोर्सेस प्रा.लि. या मालाची हाताळणी करणाऱ्या गोदामात चोरी करून गोदामाला आग लावणाऱ्या ७ आरोपींना उरण पोलिसांनी अटक केली आहे. त्यामुळे जेएनपीए परिसरातील गोदामांना आगी लावणाऱ्यांचे धाबे दणाणले आहेत. या गोदामाला ८ जानेवारी रोजी दुपारी आग लागल्याची दुर्घटना घडली होती. मात्र सामवेदा लॉजिस्टिक या गोदामातील मालाची ७ जानेवारी रात्री संगनमताने चोरी करण्यात आली. त्यानंतर ८ जानेवारी २०२४ रोजी दुपारी माल लंपास होताच आरोपींनी या सामवेदा लॉजिस्टिक गोदामाला आग लावण्यात आली. पोलीस सूत्रांकडून मिळालेल्या वृत्तानुसार ८ जानेवारी २०२४ रोजी दुपारी १.४५ वाजता उरण तालुक्यातील विंधणे ग्रामपंचायत हद्दीतील विंधणे-दिघोडे मार्गावर कंठवली गावाजवळ असलेल्या सामवेदा लॉजिस्टिक या गोदामाला

आग लागल्याची दुर्घटना घडली होती. मात्र ही आग आरोपी रोमेश सूर्यकांत भुवड (२५, रा. उरण), सिद्धेश विजय रहाटे (२६, रा. उरण), किरण दशरथ पंडित (४०, कळवा, ठाणे), दिगंबर आनंदा वानखेडे (५५, रा. विंधणे), संदेश शेखर घाग (५१, रा. विंधणे), सचिन चंद्रकांत कदम (३६, रा. वाशी नाका, चेंबूर (पूर्व), मुंबई व पांडुरंग ऊर्फ पांड्या लक्ष्मण शेरेकर (३३, रा. घणसोली गाव), नवी मुंबईच्या या ७ आरोपींनी कटकारस्थान रचून सामवेदा लॉजिस्टिक इन्फ्रा रिसोर्सेस प्रा.लि.चे जनरल मॅनेजर फिर्यादी समीर विठोबा शेट्ये (४८)यांचे कंठवली येथील गोदामात ठेवण्यात आलेल्या एकूण १७ कोटी ९४ लाख रुपये किमतीचे मालापैकी १८०० रुपयांच्या सुपारी मालापैकी अंदाजे ५०० गोणी आहेत.

प्रत्येक गोणी ५० किलो वजनाची असून, प्रत्येक गोणीची किंमत ३९ हजार ५६५ प्रमाणे १ कोटी ९७ लाख ८२ हजार ५०० रुपये किंमतीची चोरी करून करण्यात आली. गोदामात ठेवलेल्या मालाचे मूल्य १७ कोटी ९४ लाख रुपये असून मालापैकी १५ कोटी ९६ लाख १७ हजार ५०० रुपये किमतीच्या मालाचे तसेच गोदामातील केबिनचे व त्यामध्ये असलेली महत्त्वाची कागदपत्रे, संगणक, सीसीटीव्ही कॅमेरे, डीव्हीआर व स्क्रीन, पंखे, प्रिंटर, हॅन्ड ट्रॉली नोंदी घेण्यासाठीचे रजिस्टर असे एकूण असे एकूण १० लाख रुपये किमतीचे साहित्य व वस्तूंचे, गोदामाचे इन्फ्राट्रस्क्चरचे दीड कोटी रुपये, असे एकूण १७ कोटी ५६ लाख १७ हजार ५०० रुपये किमतीच्या मालाला आग लावून मोठे नुकसान केल्याप्रकरणी वरील ७ आरोपींविरुद्ध उरण पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून वरील नमूद ७ आरोपींना उरण पोलिसांनी अटक केली असून, या प्रकरणी सहाय्यक पोलीस निरीक्षक शिवाजी हुलगे अधिक तपास करत आहेत.

गिरगावातील तरुणाचे सेक्स्टॉर्शन; मधुचा मोह पडला २.४० लाखांना

मुंबई : व्हॉट्सॲपच्या माध्यमातून चॅटिंग करून जवळीक साधत अश्लील चॅटिंगचे व्हिडीओ चित्रीकरण करून ते व्हायरल करण्याची धमकी देऊन गिरगावातील एका तरुणाकडून दोन लाख ४० हजार रुपयांची खंडणी उकळण्यात आल्याचा प्रकार समोर आला आहे. याप्रकरणी मधु गोयल नावाच्या मोबाईलधारकाविरोधात गुन्हा दाखल करून व्ही. पी. रोड पोलीस अधिक तपास करत आहेत.

गिरगावातील मुगभाट लेन परिसरात राहत असलेला २९ वर्षीय तरुण खासगी नोकरी करतो. यातील आरोपी मोबाईलधारक महिलेने मधु गोयल नाव सांगत व्हॉट्सॲपच्या माध्यमातून या तरुणाशी ओळख निर्माण केली. पुढे मधाळ बोलून मधुने त्याला आपल्या जाळ्यात ओढले. तिने या तरुणाशी जवळीक साधत त्याच्याशी अश्लील चॅटिंग केले. या चॅटिंगचे व्हिडीओ चित्रीकरण करून ते मित्र-मैत्रिणी, नातेवाईक, कुटुंबीयांना पाठवून व्हायरल करण्याची धमकी देऊन तिने या तरुणाकडून एकूण दोन लाख ४० हजार रुपये उकळले. भीतीपोटी तरुणाने ही रक्कम दिली. मात्र पैशांची मागणी सुरूच राहिल्याने अखेर तरुणाने व्ही. पी. रोड पोलीस ठाणे गाठून तक्रार दिली आहे.

लिव्हर ई किटवर चोराचा डल्ला

ठाणे : मॉडर्न होमीओपॅथी औषध उत्पादन क्लिनिक आणि शॉपमध्ये विक्रीसाठी ठाणे जिल्ह्यात विविध ठिकाणी पाठविण्यात येतात. ठाण्याच्या नौपाडा घंटाळी परिसरातील मॉडर्न होमीओपॅथी क्लिनिक मधून लिव्हर ई १० किट अज्ञात चोरटयाने लांबविल्याचे समोर आले. या प्रकरणी अज्ञात चोराच्या विरोधात नौपाडा पोलीस ठाण्यात विनायक रावसाहेब पाटील (३३) यांनी यासंर्भात तक्रार नोंदविली आहे. अज्ञात चोरटयाने आता पर्यंत ७० हजार २०० रुपयांच्या ९ किट लांबविण्यात आल्याचे तक्रारीत नमूद केले आहे.

मिळालेल्या माहितीनुसार विनायक रावसाहेब पाटील (३३) हे मॉडर्न होमीओपॅथी येथे ॲडमिन एक्झक्युटिव्ह पदावर काम करतात .त्यांच्या कंपनीत होमीओपॅथी औषधाचे उत्पन्न करून ते कंपनीचे उत्पादन विक्री साठी दादर खारघर, मीरा भाईंदर, व ठाणे येथे क्लिनिक शॉप आहे. प्रत्येक कार्यालय, डॉक्टर कडे विक्री करण्यात येतात. या कंपनीचे ठाणे येथे क्लिनिक आहे. या क्लिनिकमध्ये निकीता चंद्रकांत पवार व डॉक्टर शिवानी पांडे या काम करतात. २७ डिसेंबर, २०२३ मध्ये निकिता पवार यांनी लिव्हर ई १० किट चोरी होत असलयाचे कळविले. त्यानंतर ७ जानेवारी आणि ६ जानेवारी रोजी ठाणे क्लिनिकमधील ९ किट ७० हजार २०० रुपयांचे किट चोरीला गेले.

राज्यासह परराज्यांत वाहने चोरणाऱ्या टोळीला अटक

मीरा रोड : राज्यासह परराज्यात वेगवेगळ्या कंपन्यांचे ट्रक, आयशर टेम्पो व इतर वाहने चोरी करून बनावट कागदपत्रे तयार करून त्याची विक्री करणारी टोळी मीरा-भाईंदर-वसई-विरार पोलीस आयुक्तालयातील गुन्हे शाखा कक्ष १ यांनी उघडकीस आणली आहे. टोळीतील ४ आरोपींना अटक केली आहे. त्यांच्याकडून विविध राज्यांतून चोरी केलेली ७ कोटी ३२ लाख ४१ हजार रुपयांची ४७ वाहने जप्त केली आहेत.

मीरा-भाईंदर-वसई-विरार पोलीस आयुक्तालय हद्दीत वाहनचोरीच्या प्रमाणात वाढ झाली आहे. असाच प्रकार १५ फेब्रुवारी २०२१ रोजी काशिमीरा येथील अमर पॅलेस ब्रिजजवळ फिर्यादी रमेश जसवंतलाल चौधरी (रा. बोरिवली पश्चिम, मुंबई) यांनी त्यांचा हायवा टिपर/ट्रक उभा केला असताना अज्ञात व्यक्तीने चोरला. याबाबत काशिमीरा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. तसेच ३० जून २०२१ रोजी नागाई देवी मंदिराच्या बाजूला, वालीव, वसई (पूर्व) येथे फिर्यादी रामप्रकाश हरिराम यादव (रा. नालासोपारा पूर्व) यांनी त्यांचा आयशर टेम्पो उभा केला असताना कोणी तरी तो चोरून नेला. याबाबत वालीव पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता.

सपोनि प्रशांत गांगुर्डे यांना मिळालेल्या माहितीप्रमाणे तपास करण्यात आला. त्याप्रमाणे आरोपी अजहर अकबर शेख (३५, व्यवसाय-गॅरेज, मूळ रा.

७ कोटींची ४७ वाहने जप्त

धारखेड परिसर, ता. जि. छत्रपती संभाजीनगर), समीर नसीर खान (४१, रा. खंडाळा, ता. वैजापूर, जि. छत्रपती संभाजीनगर), मोहम्मद शकील मोहम्मद शौकत शाह (४८, व्यवसाय गाडी खरेदी विक्री, रा. वलगाव रोड, अमरावती), शेख नशीर शहजादमिया (४३, व्यवसाय गाडी खरेदी विक्री, रा. नांदेड) यांना ताब्यात घेऊन अटक करण्यात आली. आरोपींना न्यायालयात हजर करून पोलीस कोठडी रिमांड प्राप्त करून तपास करण्यात आला.

तपासादरम्यान आरोपींनी खोट्या कागदपत्रांच्या आधारे गाड्या अस्तित्वात नसताना अरुणाचल प्रदेश, नागलँड राज्यांतील विविध आरटीओ कार्यालयांत गाड्यांची नोंदणी करून नोंदणी नंबर व इतर कागदपत्रे प्राप्त केली. त्या कागदपत्रांआधारे ती वाहने महाराष्ट्र राज्यात पुन्हा नोंदणी करावयाची आहेत, असे सांगून संबंधित आरटीओ कार्यालयाची ऑनलाइन एनओसी प्राप्त केली. त्यानंतर कागदपत्रांवर नमूद असलेल्या मॉडेलप्रमाणे वेगवेगळ्या राज्यांतून गाड्या चोरी केल्या. चोरलेल्या गाड्यांचे मूळ इंजिन नंबर, चेसिस नंबर व इतर ओळख पटवण्यासाठी लागणारे नंबर खोडून त्यावर बनावट कागदपत्रांवरील इंजिन, चेसिस नंबर प्रिंट करून महाराष्ट्रातील आरटीओमध्ये पुन्हा नोंदणी केली. नंतर त्या गाड्या इतर लोकांना विकल्या. आरोपीकडून ७,३२,४१,००० किमतीची चोरीची विविध कंपन्यांची ४७ वाहने जप्त केली आहेत. यामध्ये ट्रक, टेम्पो, कार, हायवा या गाड्या आहेत. जप्त वाहनांपैकी १६ वाहने चोरी झाल्याबाबत १६ गुन्हे दाखल आहेत. त्यामध्ये महाराष्ट्रात १४ गुन्हे, उत्तर प्रदेश १ गुन्हा व राज्यस्थानमध्ये १ गुन्हा दाखल आहे.

> आरोपींनी चोरी केलेली वाहने परराज्यांत आरटीओकडे बोगस कागदपत्रांच्या आधारे नोंदणी करण्यात आली. यात आरटीओ अधिकाऱ्यांचा सहभाग आहे का, याचा तपास करून तसा अहवाल पाठवण्यात येणार आहे.
> – मधुकर पांडे, पोलीस आयुक्त

कोपरखैरणेतील वाढती गुन्हेगारी रोखण्यासाठी पोलिसांचे कोम्बिंग ऑपरेशन

बांगलादेशी महिलेसह ६ गुन्हेगारांची धरपकड

नवी मुंबई : कोपरखैरणे परिसरात वाढत असलेली गुन्हेगारी व अंमली पदार्थाच्या वाढत्या तस्करीचे उच्चाटन करण्यासाठी नवी मुंबई पोलिसांनी शनिवारी रात्री कोम्बिंग ऑपरेशन राबवून विविध गुन्ह्यांतील ६ आरोपींची धरपकड केली. या कोम्बिंग ऑपरेशनमध्ये ३० अधिकारी व २०० अंमलदार सहभागी झाले होते. या कारवाईदरम्यान एका आरोपीसोबत झालेल्या झटापटीत वरिष्ठ पोलीस निरीक्षक औदुंबर पाटील हे जखमी झाले.

कोपरखैरणे परिसरात गुंड टोळ्यांच्या गुन्हेगारी कारवाया तसेच अमली पदार्थाच्या तस्करीत वाढ होत असल्याचे आढळून आल्याने कोपरखैरणे पोलीस ठाण्याच्या हद्दीतील रेकॉर्डवरील आरोपी, पाहिजे आरोपी, गुंड, हिस्ट्रीशीटर, संशयित व्यक्तींचा शोध घेऊन त्यांच्यावर प्रतिबंधक कारवाई करण्याचे आदेश पोलीस आयुक्त मिलिंद भारंबे यांनी दिले होते. त्यानुसार परिमंडल -१ चे पोलीस उपायुक्त पंकज डहाणे यांच्या मार्गदर्शनाखाली शनिवारी रात्री कोम्बिंग ऑपरेशन राबवण्यात आले होते. या कोम्बिंग ऑपरेशन दरम्यान पोलिसांच्या हाती १७ घरफोडी गुन्ह्यांतील हवा असलेला आरोपी सलीम इमाम उद्दीन खान (२८) लागला. तसेच कोपरखैरणेत शरीराविरुद्धच्या दाखल गुन्ह्यातील हवा असलेला आरोपी रिझवान सादिक कुरेशी (32) हा देखील पोलिसांच्या हाती लागला. त्याचप्रमाणे खैरणे गावात बेकायदेशीररीत्या राहणारी पॉपी इमरूल मुल्ला (२०) या बांगलादेशी महिलेला पोलिसांनी या करवाई दरम्यान ताब्यात घेतले. मात्र यावेळी तिचा दीर लाहु मुना हा पोलिसांना पाहून पळाला.

यावेळी पोलिसांच्या हाती हत्येच्या गुन्ह्यातील आरोपी अज्जु जॉन फ्रान्सिस (२७) हा बोनकोडे गावात हाती लागला. यावेळी अज्जुने जामिनावर सुटल्याचे पोलिसांना सांगितले. मात्र पोलिसांनी त्याच्याकडे जामिनाच्या आदेशाची मागणी केली असता त्याने कोणतेही कागदपत्र सादर केले नाही. तसेच त्याने विचारलेल्या प्रश्नांची समाधानकारक उत्तरे देखील दिली नाहीत, त्यामुळे पोलिसांनी त्याला देखील ताब्यात घेतले. यावेळी पोलिसांच्या जाती जबरी चोरीच्या गुन्ह्यातील हवा असलेला आरोपी साहिल रफिक अन्सारी (२२) याची देखील पोलिसांनी घणसोली गावातून धरपकड केली. यावेळी त्याच्याकडे चार मोबाईल फोन सापडले.